आकर्षक लग्न पत्रिका
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२२२ ■ शनिवार १६ मे २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26


उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

## निवडणूक आयोग स्वायत्त असल्याचा देखावा कशासाठी कॅबिनेट मंत्र्याच्या समावेशावर सर्वोच्च न्यायालयाचा प्रश्न

**नवी दिल्ली, दि. १५ : निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठीच्या निवड समितीमध्ये एका कॅबिनेट मंत्र्याचा समावेश करण्यावर सर्वोच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निर्णय प्रक्रियेत कोणताही मंत्री पंतप्रधानांच्या विरोधात जाऊ शकणार नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. निवडणूक आयुक्त नियुक्ती प्रक्रिया ही स्वायत्त असल्याचा देखावा कशासाठी, असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे. निवड समितीच्या सध्याच्या रचनेत पंतप्रधान, विरोधी पक्ष नेता आणि एक खासदार यांचा समावेश आहे.**



मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) आणि निवडणूक आयुक्त (ईसी) यांच्या नियुक्तीशी संबंधित २०२३ च्या कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या कायद्यानुसार निवडणूक आयुक्तांच्या निवड समितीमधून सरन्यायाधीशांना वगळण्यात आले होते. या समितीत सध्या पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि एका केंद्रीय कॅबिनेट मंत्र्याचा समावेश आहे. या प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने समितीच्या रचनेबर चिंता व्यक्त केली.

निवडणूक आयोग केवळ स्वायत्त असणे पुरेसे नाही, तो आपल्या कामकाजात स्वायत्त असल्याचेही दिसले पाहिजे. निवड समितीचा तिसरा सदस्य एक तटस्थ व्यक्ती असावा, जो योग्य निर्णय घेऊ शकेल. पंतप्रधान, विरोधी पक्षनेते व कॅबिनेट मंत्री यांचा समावेश असलेल्या या समितीमुळे प्रक्रियेवरील नियंत्रण कार्यकारी मंडळाकडे राहते, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. कॅबिनेट मंत्री पंतप्रधानांच्या भूमिकेपेक्षा वेगळे मत मांडण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे अशा नियुक्त्यांमधील निर्णय प्रभावीपणे दोन विरूध्द एक अशा बहुमताने घेतले जातील, असे मतही न्यायालयाने नोंदवले.

मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त अधिनियम - २०२३ या काय्द्याला काही संस्था व **(पान ४ वर)**

## नीट परीक्षा आता २१ जूनला होणार

नवी दिल्ली, दि. १५ : वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पाहणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सीने परीक्षेची नवीन तारीख अधिकृतपणे जाहीर केली आहे. आता ही परीक्षा २१ जूनला होणार आहे. पेपरफुटीच्या गंभीर प्रकरणानंतर तीन मेस घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यात आली होती. केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर ही फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

नॅशनल टेस्टींग एजन्सीकडून जारी करण्यात आलेल्या माहितीनुसार, परीक्षा देशभरात एकाच वेळी आणि कडक सुरक्षा व्यवस्थेत पार पडणार आहे. एकवीस जूनला रविवार असल्याने परीक्षा केंद्रांवर विशेष पोलीस बंदोबस्त, **(पान ४ वर)**

## सातारा येथे महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण शिरपूरने बाजी मारली; ना.शिवराजसिंह चौहान यांनी केला गौरव

**धुळे, दि.१५- प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण आणि राज्य पुरस्कृत आवास योजनांमधील उल्लेखनीय कामगिरीसाठी दिला जाणारा ममहा आवास अभियान -फचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या थाटात सातारा येथे आज पार पडला. केंद्रीय ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री नामदार श्री शिवराज सिंह चौहान आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिरपूर तालुक्याला राज्यात सर्वोत्कृष्ट तालुका म्हणून गौरविण्यात आले. शिरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री प्रदीप पवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला.**



सातारा येथील सैनिक स्कूल येथे पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन भारताचे केंद्रीय ग्रामीण विकास, कृषी व किसान कल्याण मंत्री यांच्या हस्ते करण्यात आले, अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस होते. प्रमुख अतिथी म्हणून पर्यटन मंत्री नामदार शंभूराजे देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार शिवेंद्रराजे भोसले, ग्रामविकास मंत्री नामदार जयकुमार गोरे, **(पान ४ वर)**

## सुशीनाला काठावरील अतिक्रमितांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न, ११३ जणांचे अर्ज



**धुळे, दि. १५ : महानगरपालिका क्षेत्रातील देवपूर भागातील सुशी नाल्यावरील अतिक्रमणधारकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. या अतिक्रमणधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी आणि त्यांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी प्रशासनाने महानगरपालिकेच्या मध्यवर्ती सभागृहात आज सकाळी विशेष शिबिराचे आयोजन केले होते. या शिबीरात ११३ नागरीकांनी पुनर्वसनात घर मिळावे म्हणून अर्ज सादर केला आहे.**

महापालिका प्रशासनातर्फे देवपूर भागातून वाहणाऱ्या सुशीनाल्याच्या काठावरील अतिक्रमण काढण्याची कारवाई केली. महापालिकेच्या या कारवाईत अनेक जण बेघर झाले. त्यानंतर येथील नागरिकांचे पुनर्वसन व्हावे, अशी मागणी करण्यात आली. त्यासाठी आज महापालिकेत आयुक्त नितीन कापडणीस यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यात शासन निर्णयानुसार पात्र असलेल्या लाभार्थींची निवड करण्याची प्रक्रिया सुरू झाली. या शिबिरात सुमारे ११३ लोकांनी अर्ज दाखल केले असल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने देण्यात आली. सकाळी महानगरपालिकेच्या **(पान ४ वर)**

## खंडणी व शरीर संबंध महिलेकडे मागणी

धुळे, दि १५ : सोशल मीडियावर व्हिडीओ आणि छायाचित्र व्हायरल करण्याची धमकी देत महिलेकडे एकाने शरीर संबंधाची मागणी केली. एवढ्यावरच न थांबता दमदाटी करत पाच लाखाची खंडणी मागितली, या प्रकरणी संशयितांविरुद्ध चाळीसगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

चाळीसगाव रोड पोलीस ठाणे हद्दीतील पंचवीस वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. तिच्या फिर्यादीनुसार, फिरदोस नगर परिसरातील रहिवासी अन्सारी उमेर अजीज याने इंस्टाग्रामच्या माध्यमातून मॅसेज आणि कॉल केला. **(पान ४ वर)**

## बनावट दारू कारखाना प्रकरणी फराराचा शोध सुरू; इतरांचा जामीन

**शिरपूर दि.१५ (का.प्र.)- लघुशंकेला जाण्याच्या कथित बहाण्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षकांच्या तावडीतून पसार झालेला संशयित मोगा मुसळदे याचा शोध दुसऱ्या दिवशीही सुरु होता. दरम्यान, या गुन्ह्यातील अन्य आरोपी अजयसिंह उखळदे व मनोहर पिंपळदे यांना १५ मेस न्यायालयाने जामीन मंजूर केला.**

१३ मेस सकाळी बनावट दारु कारखान्यावर छापा टाकून राज्य उत्पादन शुल्क विभागाने त्यांना अटक केली होती. त्याच रात्री साडेअकराला मोगा मुसळदे फरार झाला अशी फिर्याद निरीक्षक देवीदास नेहुल यांनी सांगवी पोलिस ठाण्यात दिली. या घटनेमुळे या विभागाची संपूर्ण कार्यपद्धतीच चर्चेचा विषय ठरली आहे.

संशयित तिन्ही आरोपी शहादा तालुक्यातील सुलतानपूर येथील रहिवासी आहेत. दुसऱ्या तालुक्यातून शिरपूरच्या दुर्गम भागात येऊन ते बनावट दारुचा कारखाना चालवत होते. आधीच राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाया कायम हास्यास्पद असतात. त्यांना मुद्देमाल सापडतो, पण आरोपी सापडत नाही. मुद्देमाल असलेल्या वाहनांचे मालक सापडत नाहीत. पाठलाग केला, रात्रीच्या अंधारात वाहन उभे करुन चालक व संशयित फरार झाले अशी या विभागाची नेहमीची लेखी कार्यपद्धती असते. त्यामागील सत्य सर्वांनाच ठाऊक असते. अशा पार्श्वभूमीवर दारुच्या कारखान्यासोबत तिघांना अटक करणे ही निश्चितच महत्त्वपूर्ण कामगिरी ठरणारी होती. पण तिथेही या विभागाने ढिसाळपणा दाखवला. एक अधिकारी व एक कर्मचारी रात्री साडेअकराला तीन आरोपींची वाहतूक करतात हे कोणत्या कार्यपद्धतीत **(पान ४ वर)**

## २२ मे पासून धावणार उधना-निजामुद्दीन रेल्वे

नंदुरबार, दि.१५(प्रतिनिधी)- पश्चीम रेल्वे विभागाकडून उधना-निजामुद्दीन एक्सप्रेस रेल्वेगाडी आता सुरत-भुसावळ लोहमार्गावरुन धावणार आहे. या गाडीला नवापूर, चिंचपाडा, नंदुरबार व भुसावळ या रेल्वेस्थानकावर धावणार आहे. दि.२२ मे पासून दोन्ही बाजुंनी गाडी क्र.०९१२१ व ०९१२२ या दोन रेल्वेगाड्या धावणार आहे, अशी माहिती रेल्वे विभागाकडून देण्यात आली आहे.

पश्चिम रेल्वे विभागाने उधना ते निजामुद्दीन जक्शन ही एक्सप्रेस गाडी आता २२मेपासून तात्पी लाईनवरुन सुरु करण्यात येत आहे. दि. मे रोजी गाडी क्र. ०९१२१ ही उधना येथून **(पान ३ वर)**

## बनावट नोटा बँक मशिनमध्ये भरल्या धुळ्यात एका तरूणावर गुन्हा दाखल

**धुळे, दि.१५- चिल्ड्रन बँकेच्या पाचशे आणि शंभरच्या तब्बल शंभर बनावट नोटा एकाने शहरातील कॅश डिपॉझिट मशीनमध्ये जमा केल्या. पन्नास हजार रुपये आपल्या बँकेच्या खात्यावर जमा होतील, या अविर्भावात संशयित असतानाच हा गैरप्रकार उघडकीस आला. याप्रकरणी आझाद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.**

शहरातील गल्ली क्रमांक सहामध्ये एचडीएफसी बँकेची मुख्य शाखा असून शाखेबाहेर कॅश डिपॉझिट मशीन आहे. या मशिनद्वारे खात्यात पैसे जमा करता येतात.

लहान मुले खेळण्यासाठी वापरणाऱ्या नोटा हुबेहुब चलनी नोटांप्रमाणे दिसतात. संशयित सचिन संभाजी पिसोटे (वय २४, रा. सुसारे, अहिल्यानगर) ९ मेस सकाळी दहाच्या सुमारास आला. त्याने या कॅश डिपॉझिट मशीनमध्ये चिल्ड्रन बँकेच्या बनावट नोटांचा भरणा केला. या नोटा मशीनद्वारे जमा झाल्याने आपल्या खात्यात पन्नास हजारांची रक्कम जमा होईल, अशी अपेक्षा संशयिताला होती. मात्र, या मशिनमध्ये नकली नोटा असल्याचे बँक **(पान ४ वर)**

## गुजराती समाजाची सर्वसाधारण सभा

धुळे, दि.१५- श्री गुजराती समाज धुळेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१७ मे २०२६ रोजी मालेगाव रोडवरील हॉटेल गणपती पॅलेस येथे सायंकाळी ४.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे. या सभेचे अध्यक्षस्थान ॲड. संजीव आर.वाणी भुषविणार आहेत. या सभेत मागील जमाखर्चास मंजूरी देणे, प्रोसिडींग वाचून कायम करणे यांसह शहरालगत समाजासाठी योग्य जागा घेवून त्याठिकाणी समाज भवन बांधणे तसेच आयत्यावेळच्या विषयांवर विचार विनिमय केला जाणार आहे. उपस्थितीचे आवाहन ॲड.संजीव वाणी, डॉ.विशाल वाणी, अंकुर अनिल शहा यांनी केले आहे.

## जनगणनेच्या कामातील शिक्षकांवरील गुन्हे मागे घ्यावे- आयुक्तांना निवेदन



**धुळे, दि.१५- भारतीय जनगणना २०२७च्या कामासाठी नियुक्त केलेल्या काही शिक्षकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. शिक्षकांवरील गुन्हे मागे मागे घेण्यात यावे. या मागणीचे निवेदन धुळे महानगर माध्यमिक शिक्षक संघ,धुळेच्या वतीने मनपा आयुक्त नितीन कापडणीस यांना देण्यात आले.**

निवेदनात नमुद केले आहे की, भारतीय जनगणना २०२७ कामी प्रगणक नियुक्ती करतांना संबंधीत व्यक्ती किमान बारावी असणे तसेच त्याला संगणक, स्मार्ट फोन हाताळता येणे व सर्वांत महत्वाचे म्हणजे तो शासकीय कर्मचारी असणे बंधनकारक असतांना देखील प्रशासकीय चुकीमुळे शाळा पालक संघाकडून तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर नियुक्त कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले. सदर कर्मचाऱ्यांचा नियुक्ती कार्यकाळ दि.३० एप्रिल २०२६ रोजी संपुष्टात आलेला असतांना मे २०२६ मध्ये त्या कोणत्याही शासकीय, निमशासकीय आस्थापनेवर कार्यरत नाहीत अशा परीस्थितीत गुन्हे दाखल करणे ही दडपशाही आहे. संबंधितांवरील गुन्हे मागे **(पान ४ वर)**

## दुहेरी हत्याकांडामुळे शिरपूर शहर हादरले मुलाने आई वडीलांची केली निर्घृण हत्या

**शिरपूर दि.१५ (का.प्र.): शिरपूर तालुक्याला हादरवून टाकणारा गुन्हा १५ मेस दुपारी शहराजवळ मांडळ शिवारात घडला. तेथील चंद्रमौळी सोसायटीतील घरात वरच्या मजल्यावर झोपलेल्या आई वडिलांच्या डोक्यात दगडी खलबत्त्याने घाव घालून पोटच्या मुलाने त्यांचा निघृण खून केला. पोलिसांनी संशयिताला अटक केली असून रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते.**

वडिलांकडून पत्नीसमोर वारंवार होणाऱ्या अपमानामुळे संतापून मुलाने हे कृत्य केल्याची माहिती पोलिसांनी दिली. हे कृत्य पाहणाऱ्या सुनेने खोलीत जाऊन दरवाजाची कडी लावून घेतली. त्यामुळे तिचा व तिच्या लहान बाळाचा जीव बचावला.

मृतांमध्ये गंगा महतो (वय ५०) आणि रंजूदेवी महतो (वय ४२) यांचा समावेश आहे. त्यांचा मुलगा चंदन महतो याने दोघांचा खून केल्याचा संशय आहे. महतो कुटूंब बिहार राज्यातील दरभंगा येथील रहिवासी येथील रहिवासी आहे. २५ एप्रिलला **(पान ४ वर)**

## प्रियांक कानूनगो यांचा नंदुरबार जिल्हा दौरा

नंदुरबार, दि.१५(प्रतिनिधी)- राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, नवी दिल्लीचे सदस्य प्रियांक कानूनगो हे १९ व २० मे २०२६ रोजी नंदुरबार जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून विविध ठिकाणी भेटी देऊन मानवाधिकार विषयक बाबींचा आढावा घेणार आहेत.

दौऱ्यानुसार १९ मे रोजी सायंकाळी ५.३० वाजता ते बडवानी (मध्य प्रदेश) येथून प्रस्थान करून रात्री नंदुरबार येथे मुक्कामी येणार आहेत. २० मे रोजी सकाळी आयोगाच्या निर्देशानुसार स्थानिक भेटीनंतर ते शहादा येथून तोरणमाळ प्रस्थान करणार आहेत. तेथे परिसरातील नागरिकांशी संवाद साधून विविध बाबींची माहिती घेणार आहेत. त्यानंतर दुपारी नंदुरबार येथे मानवाधिकार आयोग आणि **(पान ४ वर)**

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,45,200 रु.+3% GST
सोने- 24 K -1,58,500 रु.+3% GST
चांदी- 2,71,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## सोनगीर ग्रामीण रुग्णालयाचा रामभरोसे कारभार गरोदर महिलेची परवड, ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप

**सोनगीर दि. १५(प्रतिनिधी)- येथील ग्रामीण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची रुग्णांप्रती असलेली अनास्था पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. शुक्रवारी एका गरोदर महिलेला वेळेवर उपचार न मिळाल्याने रुग्णालयातील रिक्त खुर्च्या आणि डॉक्टरांच्या अनुपस्थितीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासकीय ढिसाळपणात सुधारणा होत नसल्याने ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.**

शुक्रवार, दि. १५ मे रोजी संध्याकाळी ७ वाजेच्या सुमारास ग्रामीण रुग्णालय परिसरातील बेघर वस्तीतील सावित्रीबाई नाना भिल या गरोदर महिलेला अचानक अस्वस्थ वाटू लागले. प्रकृती खालावल्याने नातेवाईकांनी व गल्लीतील तरुणांनी तिला तातडीने ग्रामीण रुग्णालयात नेले. मात्र, रुग्णालयात पोहोचल्यावर तेथे एकही डॉक्टर कर्तव्यावर हजर नव्हता. केवळ एक परिचारिका (नर्स) तेथे उपस्थित होती.महिलेची अवस्था पाहून नातेवाईकांनी तातडीने रुग्णवाहिकेची मागणी केली. मात्र, रुग्णालयाची हक्काची रुग्णवाहिका आणि '१०८' क्रमांकाची रुग्णवाहिका अशा दोन्ही रुग्णवाहिका नादुरुस्त असल्याचे सांगून प्रशासनाने हात वर केले. अत्यवस्थ रुग्ण समोर असताना मदतीऐवजी तांत्रिक कारणांचे उत्तर मिळाल्याने नातेवाईकांनी रुग्णालयात संताप व्यक्त केला. नातेवाईक आणि तरुणांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर सुमारे अर्ध्या तासाने संबंधित डॉक्टर दवाखान्यात दाखल झाले. ड्युटीवर असताना कुठे गेला होतात? असा जाब विचारला असता, मी गावात पाण्याची बाटली घ्यायला गेलो होतो. असे बेजबाबदार आणि असमर्थनीय उत्तर डॉक्टरांनी दिले. यामुळे उपस्थित नागरिकांमध्ये अधिकच संताप पाहायला मिळाला. अखेर १०२ क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर रुग्णवाहिका उपलब्ध झाली आणि सदर महिलेला पुढील उपचारासाठी धुळे येथे हलवण्यात आले.ज्यावेळी पीडित महिलेला रुग्णालयात आणले, तेव्हा रुग्णालयातील सर्व खोल्या उघड्या होत्या, मात्र त्या पूर्णपणे रिकाम्या होत्या. एकीकडे उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांची संख्या मोठी असताना, दुसरीकडे वैद्यकीय अधिकारी **(पान ४ वर)**

## विभा.पो.महासंचालकपदी पडवळ यांची नियुक्ती

धुळे, दि.१५- नाशिक विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र नाशिक दत्ता कराळे यांची विशेष पोलीस महानिरीक्षक राज्य मानवी हक्क आयोग येथे बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी प्रविण पडवळ हे विशेष पोलीस महानिरिक्षक नाशिक परिक्षेत्र नाशिक म्हणून रूजू झाले आहेत. धुळे जिल्ह्याचे माजी पोलीस अधीक्षक प्रवीण आर पाटील यांची पुणे पोलीस अधीक्षक गुन्हे अन्वेषण खात्यातून पोलीस उपायुक्त पुणे शहर म्हणून बदली करण्यात आली आहे शासनाने नुकत्याच काढलेल्या बदल्यांच्या आदेशामध्ये **(पान ३ वर)**

## एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूलमधील विज्ञान विभागाची साची अग्रवाल ९३.८० टक्के गुण मिळवून जिल्ह्यात प्रथम

**धुळे, दि.१५- श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ मुंबई संचलित धुळे येथील एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूलची बारावीची इयत्ता सायन्स विभागातील विद्यार्थिनी साची अग्रवाल ९३.८० टक्के गुणांसह धुळे जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने यशस्वी ठरली असून एस.व्ही.के.एम. संस्थेतर्फे तिच्यासह सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.**



धुळे एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल चा सायन्स व कॉमर्स विभागाचा बारावी चा निकाल १०० टक्के लागला असून सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

एस.व्ही.के.एम. संस्थेतर्फे धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

सायन्स विभागातून साची किर्तेश अग्रवाल ९३.८० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक, दक्ष कुणाल मेहता ९३ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, मनन महावीर नहर ८९ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक, राजवीर राजेश बतवाल ८८.२० टक्के गुण मिळवून चतुर्थ क्रमांक, ऋतू ललित भावसार ८५.४० टक्के व **(पान ४ वर)**



जांभुळ ज्युस मिळेल
नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिझर्व्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.
संकेत नित्या फार्म
जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

## तांत्रिक चुकीने नाशिक विभागात नावे नोंदली गेलेल्या शिधापत्रिकाधारकांसाठी दुरुस्तीची संधी- आ.अग्रवाल

**धुळे, दि.१५- शहर परिसरातील शिधापत्रिकेतील ज्या व्यक्तींची नावे तांत्रिक चुकीने अथवा अन्य कोणत्याही कारणाने नाशिक विभागात ऑनलाइन दिसत आहेत अशा व्यक्तींना त्यांची नावे पुन्हा एकदा धुळे जिल्हा पुरवठा विभागाकडे स्थलांतरित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्या व्यक्तींची नावे शिधापत्रिकेत आहेत पण ती ऑनलाइन नाशिक विभागात दाखवली जात आहेत, अशा व्यक्तींनी धुळे ग्रामीणच्या तहसीलदारांच्या नावाने अर्ज करून आपल्या आधार कार्डच्या झेरॉक्स प्रतीसह आपले अर्ज १८ मे ते २६ मे दरम्यान धुळे ग्रामीणच्या तहसील कार्यालयातील टपाल शाखेत जमा करावेत, असे आवाहन आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी केले आहे.**



दरम्यान, या कार्यवाहीसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून, ही सर्व प्रक्रिया मोफत केली जाणार आहे.

धुळे शहरात वास्तव्यास असलेल्या अनेक कुटुंबांतील काही सदस्यांची नावे त्यांच्या शिधापत्रिकेत दिसतात. मात्र, ऑनलाइन पडताळणीत त्यांची नावे तांत्रिक चुकीने अथवा अन्य कोणत्याही कारणाने नाशिकच्या जिल्हा पुरवठा विभागात नोंदली गेल्याचे दिसून येत आहे. यामुळे धुळे शहरातील अनेक कुटुंबांतील सदस्यांना स्वस्त धान्य व शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याचे चित्र आहे. एवढेच नव्हे तर ऑनलाइन शिधापत्रिकेत ही नावे नाशिकला स्थलांतरित झाल्याचे दाखवत असल्याने अशा व्यक्तींना केंद्र शासनाच्या आयुष्यमान कार्ड व आभा कार्डची नोंदणी करण्यातही अनंत अडचणी येत आहेत. त्यामुळे त्यांना आरोग्याच्या विविध योजनांचा **(पान ३ वर)**

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या कृष्णा भगतवर सक्त करवाईची मागणी

**धुळे दि. १५ : देवपुरातील नगावबारी परिसरात राहणारा सुभाष चित्ते उर्फ भोंदू बाबा असलेल्या कृष्णा भगत याच्यावर गंभीर कारवाई करण्यात यावी. पिडीत अल्पवयीन मुलगी आणि तिच्या पालकांना न्याय द्यावा. पोलिस प्रशासनाकडून हे काम होत नसेल तर त्याला आमच्याकडे सोपवा आम्ही न्याय करू, असे म्हणत तृतीयपंथी संघटना आणि नागरिकांनी संताप व्यक्त केला. जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने करीत प्रशासनास निवेदन देण्यात आले. कथित भोंदू बाबा कृष्णा भगत हा साडी परिधान करून बनावट तृतीयपंथी होत नागरिकांना गंडवतो. अशा इतरांचाही शोध घ्यावा, अशी मागणी पार्वती परशुराम जोगी यांनी केली आहे.**



देवपूरातील नगावबारी परिसरात राहणारा सुभाष चित्ते याने स्वतःची ओळख कृष्णा भगत, अशी केली होती. मध्यंतरी तो साडी परिधान करून वावरत असे. कधी भोंदू बाबा बनून तर कधी बनावट तृतीयपंथी होऊन नागरिकांना गंडवत असल्याची माहिती पुढे आली आहे. काही महिन्यांपुर्वी त्याने नगावबारी परिसरात राहणाऱ्या तेरा वर्षाच्या मुलीस अमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केला. त्याचवेळी त्याने त्या कारनाम्याचे चित्रीकरणही केले. नंतर हे चित्रीकरण दाखवून तो पिडीत मुलीस **(पान ३ वर)**

आपला महाराष्ट्र

# विविध सनातन्यांचा रेटा आणि सशक्त संविधान

भारतीय स्वातंत्र्यानंतर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानातील तरतुदी नुसार श्रद्धा आणि परंपरांना तसेच उपासनांना जीवनात स्थान देण्याचे नागरिकाला स्वातंत्र्य आहे. त्याचा गैरफायदा घेऊन विविध धर्म मार्तंडांनी पारंपारिक धार्मिक श्रद्धांना सामान्य माणसाच्या डोक्यावर बसवून संविधानातील जे दिशा निर्देश आहेत ते नाकारण्यातच धन्यता मानलेली आहे. मूठभर धर्मगुरू त्यांच्या धर्मातील सर्व स्तराच्या नागरिकांना वेठीस धरून संविधानाला विरोध करताना दिसतात आणि त्यांचे समर्थन करणाऱ्यांची संख्या अलीकडच्या काळात खूप वाढली आहे. त्यामुळे संविधान विरोधकांची संख्या वाढली आहे. दुसरीकडे भारतासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या देशातील समाजाचे संचालन करण्यासाठी आणि त्या परंपरा टिकवून ठेवण्यासाठी धार्मिक मान्यता प्रभावी ठरलेल्या नाहीत असाही अनुभव आहे तरीपण त्यांची ताकद अलीकडच्या काळात शासन व्यवस्थेमुळे वाढली असून त्यांच्या सनातनी विचारांना व पारंपरिक मान्यतांना प्रचंड बळ मिळालेले आहे. ज्या देशांची रचना धर्माधिष्ठित आहे त्या देशात प्रशासन आणि धर्म हे दोन्ही हातात हात घेऊन चालतात. तेथील धर्मगुरूंची आज्ञा सरकार पाळते मात्र असे असले तरी ह्या राजवटी फारशा टिकल्या नाहीत. त्या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटनेवर आधारित प्रशासकीय किंवा शासकीय व्यवस्था परिवर्तनाच्या दिशेने जाणारी आहे. दुर्दैवाने गेल्या बारा वर्षांपासून या तत्त्वांना शह देऊन धर्माधिष्ठित व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न आपल्या देशात चालू आहेत. आपल्या देशाचे संविधान आणि एकूणच स्वातंत्र्य मोठ्या संघर्षावर उभे आहे. याचा आजच्या राज्यकर्त्यांना विसर पडलेला असून त्यांना तो हिशोब ठेवायचाच नाही. त्यांना आपलेच घोडे पुढे दामटायचे आहे. तो अजेंडा विशिष्ट वर्गाच्या हातात शासन व्यवस्था देण्याचा असून विभाजनवादी आहे. मुळात भारतीय संविधान स्वातंत्र्याच्या संघर्षातील मूल्यांच्या आधारावर निर्माण केले गेले आहे. आपली संविधान सभा मोठ्या प्रमाणावर भारताच्या जनतेचे प्रतिनिधित्व करत होती, तिने भारतीय संविधानाची निर्मिती केली, हे संविधान आपल्या राष्ट्रीय जीवनाचे मार्गदर्शक आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यावर आधारित लोकशाही समाजाची स्थापना हा आपल्या संविधानाचा गाभा आहे.

भारताला धर्माधिष्ठित राष्ट्र बनवण्याची वकिली करणारा एक वर्ग सुरुवातीपासूनच या संविधानाचा विरोध करत आला आहे. त्यांच्या विचारांचे प्रतिनिधित्व करणारे जे त्यांचे मुखपत्र आहे त्यात एकेकाळी प्रकाशित झालेल्या एका लेखात अशा विचारांचे प्रतिबिंब उमटले होते. त्यात भारतीय संविधानाला विरोध करण्यात आला होता. या संविधानातील तरतुदीत काहीही भारतीय नाही आणि आमचा समाज ते स्वीकारणार नाही. असे सांगत काहींनी तर एक पाऊल पुढे जाऊन असेही म्हटले होते की मनुस्मृती हेच आपले संविधान आहे.अशा प्रकारे एका धर्मातील एखादाच घटक संविधानातील तत्वांना विरोध करीत आला किंवा संविधानाकडे तुच्छतेने बघतो असे नाही तर काही मुस्लिम मौलानांनी देखील हाच दृष्टीकोन मांडलेला आपल्याला दिसेल. मौलाना मुफ्ती नदवी यांनी या प्रकारचे विधान केलेले आहे. काही दिवसांपूर्वी जावेद अख्तर यांच्या सोबत आयोजित केलेल्या ईश्वराच्या अस्तित्वाच्या संदर्भातील विषयावर जी चर्चा झाली होती त्यानंतरच्या काळात सदर मौलवींचे नाव पुढे आले. मुसलमानांनी धर्मनिरपेक्षतेला मान्यता देऊन आणि शरियत ऐवजी राष्ट्रीय संस्थांना सर्वोच्च स्थान देऊन चूक केली. असे विधान त्यांनी केले. अर्थातच त्यांच्या या विधानाला मुस्लिम समाजातील धर्मांध गटांचा पाठिंबा मिळाला. त्यांना मौलवींचे बोल आवडले. लोकशाही आणि देशाला धर्मापेक्षाही वरचढ ठेवण्यात येत असण्यावर त्यांनी टीका केली होती. श्रद्धावान लोकांनी इस्लामिक कायद्यांच्या विरोधात असलेल्या न्यायालयीन निर्णयांचा शांतपणे का स्वीकार करावा ? अशी टीकाही या मौलवींनी केली होती.

मनुस्मृति ब्राम्हणवादी परंपरा आणि मूल्यांचे संकलन आहे.त्यातील सर्व नियम आणि कायदे यावर ब्राम्हण्यवादी विचारांची छाया आहे.यात लपवून ठेवलेले काही नाही अगदी उघड उघड ही बाब स्पष्ट आहे. त्याचप्रमाणे शरियत मध्ये देखील विविध मुद्यांचा उल्लेख आढळतो.त्यात अनेक परंपरांचे मिश्रण आहे. तो अरबी शब्द असून त्याचा अर्थ मार्ग किंवा रस्ता असा होतो. इस्लामिक कायदे आणि आचरणासंबंधीचे नियम अनेक स्रोतांवर आधारित आहेत त्यात कुराण अंतर्भूत आहे. शरियत फक्त चुकीच्या कृत्यांसाठी शिक्षा देण्याची व्यवस्था नाही, तर तो वैयक्तिक आचरण आणि कायदेशीर प्रश्नांबाबतही मार्गदर्शनही करतो त्यास शरिया असेही संबोधतात. प्रत्यक्ष व्यवहारात शरियाची व्याख्या विविध न्याय निवाड्यांच्या विविध संस्थांकडून केली जाते.त्यात सर्व प्रकारच्या इस्लामी पंथांचा समावेश आहे.अशा प्रकारे त्या न्याय व्यवस्थेत विविधता दिसते.

जगात सुमारे ५५ ते ५६ देश मुस्लिम बहुल आहेत परंतु यापैकी फारच कमी देश शरियाच्या कायद्यानुसार चालतात. त्यात सौदी अरेबिया, इराण तसेच अफगाणिस्तानचा समावेश होतो. इतर जे मुस्लिम बहुल देश आहेत तिथे शरियतचा कायदा अंशतः पाळला जातो. किंवा अंशतः ते कायदे त्या देशात लागू आहेत.भारतात केवळ मुस्लिम पर्सनल लॉ शरियत च्या आधारावर तयार करण्यात आलेला आहे, बदलत्या काळात आणि सामाजिक परिस्थितीत ज्या पार्श्वभूमीवर बदल झालेला आहे ती लक्षात घेता या कायद्यात तसे बदल केले पाहिजेत यासंबंधी विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. भारतात धर्माच्या नावावर राजकारण करणारे सतत मनुस्मृती लागू करण्याची मागणी करतात. त्यानुसार मुस्लिम मौलवी शरियालाही उच्च स्थान मिळाले पाहिजे अशी मागणी करू लागले आहेत. एवढेच की ते उघड उघड बोलत नाहीत. त्यांच्यापैकी एकाने तसा उल्लेख केलेला आहे. बाकीचे दबक्या आवाजात बोलतात. परंतु त्यांच्या कायद्याला संविधानापेक्षा वरचे स्थान मिळू शकते का ? या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी येत नाही. मनुस्मृती लागू करावी असे काही लोक कितीही उच्चारवाने बोलत असले तरी संविधान फार पक्के आहे आणि ते सहजासहजी हलणार नाही. त्या पार्श्वभूमीवर त्या लोकांचे हे स्वप्न कदापि साकार होणार नाही त्याचप्रमाणे मौलवींचे सुद्धा शरियाच्या संदर्भातील स्वप्न साकार होणार नाही. अशाप्रकारे बोलणारे आणि तसेच स्वप्न बघणारे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत पण त्यांचा समर्थक वर्ग मोठा असल्यामुळे त्यांचे वजन सतत वाढत असते. आणि त्यांचा सनातनी विचार धर्मांधतेला बळ देण्यात यशस्वी होत असतो. याचाच अर्थ भारतीय संविधान सामान्य जनजीवनापर्यंत सक्षमपणे पोहोचवण्याची गरज आहे. असे प्रयत्न प्रभावीपणे होत नाहीत म्हणूनच सनातन्यांचे फावते. काही मुस्लिम परिवर्तनवादी कायदे तज्ञ मात्र संविधानच सर्वोच्च असल्याचे सांगतात आणि त्यांच्या दृष्टिकोनात ते तडजोड करीत नाहीत. बऱ्याच देशांमधील राज्यघटना शरियतला प्रमुख स्थान देतात. जाणीवपूर्वक तशी व्यवस्था तेथील धर्म मार्तंड करीत असतात. त्यानुसार त्या देशांचा कारभार चालतो. शरियत मधील काही तरतुदींना त्या त्या देशातील संविधानात मान्यता देण्यात आलेली आहे. त्या पार्श्वभूमीवर जगातील मुस्लिम देशांच्या अंतर्गत असलेल्या लोकशाहीवादी संस्थांची अवस्था काय आहे त्याकडे लक्ष देणे औत्सुक्याचे ठरेल. त्यानुसार जगातील ५५ ते ५६ मुस्लिम देशांपेकी काही देश अत्यंत अल्प अशाप्रकारचे लोकशाहीवादी आहेत, तर काहीं देशांमध्ये तेथील नागरिकांचा आवाज ऐकला जातो किंवा त्यांच्या मतांना महत्त्व दिले जाते. जावेद अख्तर यांच्या समवेत ईश्वराच्या अस्तित्वा बाबतच्या चर्चेत सहभागी होताना ज्या मौलवींनी शरियतला प्राधान्य दिले त्यांच्यावर सोशल मीडियावर भयंकर टीका झाली. त्यांचे विधान हे राष्ट्रविरोधी कृत्य आहे असे अनेकांनी नमूद केले. दुसरीकडे अनेकांनी शरियतचे समर्थन करताना त्या मौलवींचे तोंड भरून कौतुक केले. अर्थात अशा प्रकारचे कट्टरवादी मुस्लिमांमध्ये आहेत तसे इतरही धर्मात आहेत. त्यांची भूमिका आणि त्यांची वक्तव्ये बऱ्याच वेळेला वादग्रस्त ठरतात. तरीही ते बोलतच असतात. कारण विभाजनवादी भूमिका हा त्यांचा ध्येयवाद आहे आणि त्यानुसार ते काम करतात. आपल्याकडे लोकशाही आता आली. तिच्या रक्षणार्थ संविधान आले. संविधानाचे रक्षण करण्यासाठी असंख्य परिवर्तनवादी विचारवंत पुढे येत असतात. पण पूर्वीही मध्ययुगात कोणीही मुस्लिम शास्त्याने शरियतचा आग्रह धरलेला नाही हे विशेष म्हणावे लागेल,

भारताचा स्वातंत्र्याचा संग्राम हा लोकशाही तत्त्वांवर आधारित होता आणि त्या एकूण संग्रामाचा उद्देश लोकशाही संस्थांची स्थापना करण्याचा होता, त्या संग्रामात जे विविध विद्वान आणि विचारवंत होते त्यांच्यासोबत इस्लामचे अभ्यासक मौलाना अबुल कलम आझाद आणि स्वातंत्र्यसंग्रामाला समर्पित झालेले मुस्लिम नेते खान अब्दुल गफ्फार खान उर्फ सरहद गांधी देखील सहभागी होते. हे सर्व नेते लोकशाही, धर्मनिरपेक्ष राष्ट्र आणि लोकशाही मूल्यांच्या संवर्धनासाठी आणि ती मूल्ये प्रस्थापित करणाऱ्या संस्थांच्या स्थापने साठी कटिबद्ध होते. त्यात कुठेही त्यांनी व्यावहारिक तडजोड केलेली नाही. त्यामुळे त्यांच्याबाबत कुठलीही शंका घेता येणार नाही. फाळणी नंतर जरी सरहद गांधी बलुचिस्तानात गेले तरी पाकिस्तानच्या कैदेत अनेक वर्षे होते. पाकिस्तानच्या निर्मितीला विरोध हा स्वातंत्र्यानंतर त्या देशाने गुन्हा मानला आणि त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. त्यांची सुटका झाल्यानंतर ते जेव्हा जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांच्यासोबत एक पोतडी असायची आणि त्यात भारताची माती असायची. एवढी प्रचंड निष्ठा खान अब्दुल गफार खान यांची भारताप्रती होती. त्यामुळे त्यांच्याविषयी आणि त्यांच्यासोबतच्या अन्य देशभक्तांविषयी कुठलीही शंका घेण्यास वाव नाही. भारतीय मुस्लिमांच्या समोर अशा प्रकारे स्वातंत्र्य समरांगणात असलेल्या महानुभावांचा आदर्श आहे. शिवाय काही सत्यशोधक मुस्लिम चळवळीचा प्रभाव आहे. त्यामुळे अनेक मुस्लिम लोकशाहीवादी संकल्पनांचा आदर करणारे आहेत. त्यातूनच काही आंदोलने आपल्या देशात झाली. शाहीन बाग दिल्ली येथे मुस्लिम महिलांनी केलेले आंदोलन हा त्यातलाच एक भाग म्हणावा लागेल. सध्याच्या काळात हा समाज काहीसा दबलेला आणि भीतीयुक्त वातावरणात जगणारा दिसतो. आंतरराष्ट्रीय धोरणाच्या पार्श्वभूमीवर मुस्लिम राष्ट्रांशी असलेले भारताचे संबंध आणि त्यांच्या भरोशावर आयात करावी लागणारी ऊर्जा साधने अशी परिस्थिती असली तरी भारतात हा समाज विशिष्ट धर्माच्या निशाण्यावर आहे. सोशल मीडियावर, त्यांना लक्ष करण्यात येते.. दुसरीकडे तो बहुतांश रुढीवादी आहे. त्या पार्श्वभूमीवर लोकशाहीतील ज्या आधुनिक संस्था आहेत त्यांच्या माध्यमातून एक भारतीय नागरिक म्हणून त्यांच्या स्वतःच्या अधिकारांचे रक्षण करणे आणि परिवाराचे रक्षण करणे अशी आव्हाने त्यांच्यासमोर आहेत. त्या पार्श्वभूमीवर मुस्लिमांमध्ये असलेला रूढी वाद कमी करण्यासाठी त्यांच्यातल्याच अनेकांनी पुढे येणे आवश्यक आहे. हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत हा समाज सर्वार्थाने समृद्ध होणार नाही. एकूणच धर्माधर्मातील सनातन्यांची धडपड आपल्या धर्मातील तत्त्वांसाठी चाललेली असते. तो अधिकार राज्यघटनेने सर्वांना दिलेला किंवा प्रदान केलेला असला तरी संविधानाची बुज राखणे आवश्यक आहे. संविधानावर कुरघोडी करणाऱ्या तत्त्वांची आणि संविधानातील तरतुदींची गल्लत होऊ नये. शेवटी कुणाला काही वाटत असले तरी प्रतिकूल वातावरणातही संविधान वाचवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.



# ऑनलाईन औषध विक्री विरोधात वीस मे रोजी भारत बंद आंदोलन

**नवापूर,दि.१५- ऑनलाईन औषध विक्री आणि बेकायदेशीर इंटरनेट फार्मसीच्या विरोधात अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटना एआयओसीडी यांनी पुकारलेल्या दि.२० मे २०२६ रोजीच्या भारत बंद आंदोलनास पाठिंबा दर्शवत नंदुरबार जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनतर्फे नवापूरचे तहसीलदार दत्तात्रय जाधव तसेच पोलिस निरीक्षक अभिषेक पाटील यांना निवेदन सादर करण्यात आले.**

या निवेदनात ऑनलाईन औषध विक्रीमुळे स्थानिक औषध विक्रेत्यांसमोर आर्थिक संकट निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच बेकायदेशीर इंटरनेट फार्मसी आणि विविध ई-पोर्टलद्वारे होत असलेल्या औषध विक्रीमुळे ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ होण्याची शक्यता असल्याची गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटना एआयओसीडी देशभरात ऑनलाईन औषध विक्री, इंटरनेट फार्मसी तसेच जीएसआर ८१७(ई) आणि जीएसआर २२०(ई) संदर्भातील नियमांबाबत अनेक वेळा शासनाकडे पाठपुरावा करत आहे. मात्र अद्याप ठोस निर्णय न झाल्याने २० मे २०२६ रोजी देशव्यापी बंदचे आवाहन करण्यात आले आहे. या आंदोलनात महाराष्ट्रासह नंदुरबार जिल्ह्यातील औषध विक्रेते मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती निवेदनातून देण्यात आली.

निवेदनावर नंदुरबार जिल्हाध्यक्ष निलेश शर्मा, सचिव अरुण कुबेरिया तसेच तालुका अध्यक्ष तुषार मराठे यांच्या सह्या आहेत. यावेळी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाने ऑनलाईन औषध विक्रीवर नियंत्रण आणण्यासाठी कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी केली.बंद काळात नागरिकांची गैरसोय होऊ नये आणि अत्यावश्यक औषधांची गरज भासल्यास असोसिएशनतर्फे काही संपर्क क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत. इमर्जन्सी औषधांसाठी नागरिकांनी तुषार मराठे, सुलेमान मन्यार, खुशबु गावीत यांच्याशी संपर्क साधावा.

औषध विक्रेत्यांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचवून योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली असून नागरिकांनी आंदोलनास सहकार्य करावे. असे आवाहन असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे.

# शहाद्यात वाढते अतिक्रमण, वाहतूक कोंडी प्रशासनाने पावले उपसावी- उपनगराध्यक्षा

शहादा,दि.१५(का.प्र.)- शहादा शहरात सध्या अतिक्रमणाने कळस गाठला असून बेशिस्त वाहतूक आणि अनियंत्रित पार्किंगमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या गंभीर समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाने तातडीने संयुक्त आणि कठोर उपाययोजना कराव्यात,अशी मागणी शहादा नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सौ. माधवी मकरंद पाटील यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

मुख्याधिकारी साजिद पिंजारी यांना दिलेल्या निवेदनात उपनगराध्यक्षा सौ. माधवी पाटील यांनी म्हटले आहे की, शहरातील प्रमुख मार्ग जसे की, महात्मा फुले चौक ते श्रेयस हॉस्पिटल, स्टेट बँक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, चार रस्ता ते सोनार गल्ली आणि महात्मा गांधी पुतळा ते बागवान गल्ली या भागात वाहतुकीची मोठी कोंडी होत आहे. वन-वे नियम धाब्यावर बसवून राँग साईडने वाहने चालवली जात आहेत, ज्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच मुख्य रस्त्यांवर अवजड वाहनांचा प्रवेशही बिनधास्त सुरू असून प्रशासनाचा धाक उरला नसल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे शहादा नगरपालिका कार्यालयासमोरच मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे वाढली आहेत. या परिसरात नॉनव्हेज विक्रीच्या गाड्या आणि अंडाकरी विक्रेत्यांनी रस्त्यालगतच व्यवसाय थाटल्याने तिथे सतत दुर्गंधी, अस्वच्छता आणि गर्दी असते. यामुळे कार्यालयात येणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासनाच्या नाकाखालीच हे अतिक्रमण होत असल्याने सामान्य नागरिकांमध्ये चुकीचा संदेश जात असल्याचे पाटील यांनी निवेदनात नमूद केले आहे.शहरातील मुख्य रस्त्यांवर फळ विक्रेते, थंड पेय विक्रेते आणि अन्य व्यावसायिकांनी रस्त्यावरच दुकाने थाटल्याने पादचाऱ्यांना चालणे कठीण झाले आहे.व्यवसाय करण्याचा सर्वांना अधिकार आहे, मात्र सार्वजनिक रस्ते अडवून नागरिकांना वेठीस धरणे योग्य नाही. प्रशासनाने अशा सर्व फेरीवाल्यांसाठी तातडीने एक नियोजित जागा निश्चित करून रस्ते मोकळे करावेत, असेही त्यांनी सुचवले आहे.वाहतूक सुलभ करण्यासाठी डायमंड कॉर्नर परिसरातील बॅरिकेटिंगचे नियोजन तपासून तिथे दुचाकींसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्यावा. तसेच रस्त्याच्या एका बाजूला नियोजनबद्ध दुचाकी पार्किंग व्यवस्था कार्यान्वित करावी. पोलीस आणि नगरपालिका प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवून अवैध पार्किंग आणि राँग साईड वाहतुकीवर दंडवजा कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.अतिक्रमणमुक्त, शिस्तबद्ध आणि सुरक्षित शहादा ही शहराची गरज आहे. जर वेळेत उपाययोजना झाल्या नाहीत तर भविष्यात मोठे अपघात घडू शकतात, असा इशाराही उपनगराध्यक्षा सौ.माधवी पाटील यांनी दिला आहे.

# प्रभाग सहा मध्ये नवीन डीपी बसवण्याच्या कामाला वेग; आ.अनुप अग्रवाल यांच्या पाठपुराव्याला यश

**धुळे, दि.१५- शहरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या समस्येवर अखेर कार्यवाहीला सुरुवात झाली असून प्रभाग क्रमांक सहा मधील विविध भागांमध्ये नवीन डीपी बसवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामामुळे नागरिकांना दिलासा मिळणार असल्याची भावना परिसरातून व्यक्त होत आहे. आ.अनुप अग्रवाल यांनी नुकतीच वीज विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार आज प्रभाग क्रमांक ६ मधील पाटील नगर, सर्वेश्वर नगर, गणेश नगर, आदी भागांसह चार ते पाच ठिकाणी नवीन डीपी बसवण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आल्याने आ.अग्रवाल यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.**



प्रभाग क्रमांक ६ मधील नगरसेविका वैभवी अमित दुसाने यांनी परिसरातील नागरिकांच्या वतीने वीज विभागाचे शहर अभियंता जितेंद्र महाजन यांना निवेदन देऊन वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याबाबत तक्रार केली होती. तसेच धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनाही यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते. शहरातील इतर नगरसेवकांनी देखील वाढत्या वीजभारामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाची माहिती देत डीपींची क्षमता वाढवण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर आ.अग्रवाल यांनी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याशी चर्चा करून धुळे शहरातील वीज समस्येवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली. त्यानंतर राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत नवीन डीपी मंजुरीसाठी तात्काळ आदेश दिल्याचे सांगण्यात आले.

यावेळी वीज विभागाचे शहर अभियंता जितेंद्र महाजन, नगरसेविका वैभवी दुसाने, उपमहापौर ज्योत्सना पाटील, नगरसेवक तथा माजी उपमहापौर भगवान गवळी, नगरसेवक जयेश वावदे यांच्यासह चंद्रशेखर तोरवणे, मधुकर सूर्यवंशी, एस. एम. पाटील, अजबराव खैरनार, प्रशांत साळुंखे, प्रणय साळुंखे, बापूसाहेब भोसले, अमित दुसाने, प्रफुल्ल पाटील आकाश बोरसे, शाम ब्राह्मणकर, श्याम बोरसे, प्रेमचंद अहिरराव, विनायक देवरे, वसंतराव भामरे, डॉ. अनिल गरुड, भागवत पाटील आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच यावेळी गोंदुर सबस्टेशन आणि भोकर सबस्टेशन ची नवीन वाढीव ट्रान्सफॉर्मर चा प्रस्ताव देण्यात आला लवकरच यासी मंजुरी मिळेल असे उपमहापौर ज्योत्सना पाटील, माजी उपमहापौर तथा नगरसेवक भगवान गवळी, नगरसेविका वैभवी दुसाने, नगरसेवक जयेश वावदे या चारही नगरसेवकांच्या वतीने आश्वासन देण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिकांनी वीज समस्येच्या निराकरणासाठी पुढाकार घेतल्याबद्दल आमदार अनुप अग्रवाल यांचे आभार मानले.

# निजामपूर गावात लुटमारीचा प्रयत्न फसला बंदूकीतून वीस गोळ्या झाडल्या: चोर पळाले

**धुळे, दि. १५ : साक्री तालुक्यातील निजामपूर शिवारात असलेल्या सौर ऊर्जा निर्मिती साहित्याच्या कंपनीत दहा ते बारा जणांनी लुटमार करण्याचा प्रयत्न केला. सुरक्षा रक्षकाने छर्याच्या बंदुकीतून वीस छर्रे झाडले. त्यामुळे चोरटे पळाले. पण, त्यावेळी त्यांनी केलेल्या दगडफेकीत दोन सुरक्षारक्षक जखमी झाले. तसेच चोरट्यांनी पळून जाताना वीस हजारांची तार चोरून नेली. तसेच ५० ते ६० हजार रूपये किंमतीच्या सौरऊर्जा निर्मिती साहित्याचे नुकसान केले.**

निजामपूर शिवारात असलेल्या ॲम्पिअर कंपनीत काल पहाटे १० ते १२ चोरट्यांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला. कंपनीची संरक्षक भिंत तोडून चोरटे आत शिरले. त्यांनी साहित्य ठेवलेल्या गोदामाचा दरवाजा तोडला. पण, त्यावेळी तेथे असलेले सुरक्षारक्षक नागो लक्ष्मण जाधव यांनी चोरट्याना हटकले. तेव्हा चोरट्यांनी दगडफेक केली. तेव्हा जाधव यांनी अन्य सहकाऱ्यांना मदतीला बोलावले. त्याचवेळी त्यांच्याकडे असलेल्या छर्याच्या बंदूकीतून वीस छर्रे चोरट्यांच्या दिशेने झाडले. या वेळी चोरटयांनी केलेल्या दगडफेकीत भूषण नाईक आणि उमेश बेडसे हे सुरक्षारक्षक जखमी झाले. तर पळून जाताना चोरट्यांनी वीस हजार रूपये किंमतीची तार चोरून नेली तसेच पन्नास ते साठ हजार रूपये किंमतीच्या सौरऊर्जा साहित्याचे नुकसान केले.







## शब्दकोडे क्रमांक : २३६५



**आडवे शब्द :** १. अवकाशातून यात्रा करण्यासाठी वापरतात ते यान ४. सावकार ८.गुपित ९. घुसळून केलेली डाळ १०. पुण्यातील एक प्रसिद्ध बाग १३. हिराच्या काट्यांची झाडू १४. नगर १५. अंतर १९. संगीत सप्तकातील पाचवे स्वर २०. वड २१. खड्डा २३. थंड २५. कंकड २७. हिंदीत-टोमॅटो २९. मग- उलट लिहा ३१. पाताळ ३३.एक महिना ३४. दशानन ३६. हिरवे वाटाणे ३७. चौक ३८. स्त्री ३९. गोडाऊन ४१. मात ४२. चणे, कुरमुरे वैगरे मिसळून तयार होणारे खाद्य पदार्थ ४३. हिंदीत- भांडे ४६. चहा पिण्यासाठी वापरतात ४८. हाक ४९. वसा जो चालवतो तो ५०. भीमाचे आयुध ५२. एक हिंदी सिनेमा '** बाज ' ५३. तांबूल ५४. सांडपाणी वाहून नेणारी पळी ५५. लग्नाची मिरवणूक **उभे शब्द :** १. तब्बू, अनिल कपूर यांचा एक सिनेमा २ गुर्मी ३. चोरी करणारा ५. वस्ती ६. ध्येयाची आस ७. मनाचा निश्चय ९. तराव- उलट लिहा ११. रड १२. राशींची एकूण संख्या १३. नासलेल्या खोबऱ्याची चव १६. माती उपसण्याचे एक साधन १७. गोलाकार उठलेले वादळ १८. हिंदीत - पत्र २२. लक्ष्मी २३. मुंडके २४. बंध २५. धोकादायक २६. अमेरिकेची अवकाश संशोधन संस्था २८. ताजा ३०. माठ ३१. युद्ध ३२. वादळाचा फटका ३५.खाली - विरुद्ध ३७. विनाकारण ३९. माराचे वण ४०. एक चिवट पदार्थ ४२. दोन गोष्टींमधील अंतर ४४. जीवा ४५. वस्तू, जिन्नस ४७. पीठ मळण्याचे पात्र ४८. वल्कल ४९. महाल ५१. जुगारातील खेळी

### शब्दकोडे क्रमांक : २३६४ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | र | ता | वा | | वि | नो | द | | भ | र | डा |
| रे | ती | | ता | क | | व्हे | | क | र | म | |
| ड | | त | ह | | सा | ब | र | म | ती | | आ |
| | क | र | त | ल | | र | | र | | का | म |
| सा | ह | स | | गा | ठ | | नो | | स | | रा |
| व | र | | आ | न | | बा | | न | व | ला | ई |
| ळा | | भां | ग | | खो | ब | रे | | त | ल | |
| | पा | | री | या | ल | | व | सा | | च | ढ |
| चा | ल | क | | क | | मो | ती | | हो | | ग |
| र | | र | या | | का | ळी | | ना | | बे | |
| | भा | व | | दे | व | | बो | क | ड | | ह |
| ती | | ली | न | | ड | म | रू | | गा | र | वा |

# धुळ्यात मोगरा फुलला कार्यक्रमाचे आयोजन उपस्थित राहावे- मा.आ.कुणाल पाटील

**धुळे, दि.१५- संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्ताने धुळ्यात रविवार दि.१७ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वा. हिरे भवन धुळे येथे अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम मोगरा फुलला ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मा.आ. कुणाल पाटील यांनी केले आहे.**



सांस्कृतिक कार्य विभागाच्या सास्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासनाच्यावतीने संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० जयंती वर्षाचे औचित्य साधुन राज्यात विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम होत आहेत. त्याअनुषंगाने राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ना.आशिष शेलार,पालक मंत्री ना.जयकुमार रावल यांच्या पुढाकाराने धुळे येथे मोगरा फुलला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

मोगरा फुलला हा कार्यक्रम संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनचरित्रावर, त्यांच्या अध्यात्मिक कार्यावर आणि अभंगरचनांवर आधारित असून, संगीत, निवेदन आणि भावस्पर्शी कथन यांचा सुरेख संगम यात अनुभवता येणार आहे.या कार्यक्रमात प्रसिद्ध निरूपणकार गणेश शिंदे आपल्या प्रभावी आणि ओघवत्या शैलीतून संत ज्ञानेश्वर महाराजांचे जीवनकार्य उलगडून सांगणार आहेत. तर सुप्रसिद्ध गायिका सन्मिता शिंदे आपल्या सुमधुर आवाजातून ज्ञानेश्वर माऊलींच्या अभंगांना स्वरबद्ध करून रसिकांना भक्तिरसात चिंब भिजवणार आहेत. राज्यभरात या कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, संत साहित्य, अध्यात्म आणि संगीत यांचा अद्वितीय संगम असलेल्या या कार्यक्रमाचा लाभ रसिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांचा आणि वारशाचा जागर करणारा हा कार्यक्रम रसिकांसाठी एक अविस्मरणीय सांस्कृतिक पर्व ठरणार आहे. भक्ती, ज्ञान आणि संगीताचा सुरेल संगम अनुभवण्यासाठी धुळे जिल्ह्यातील नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन मा.आ. कुणाल पाटील यांनी केले आहे.

# रात्री उशिरापर्यंत बॅण्ड वाजविल्याने कारवाई

नंदुरबार, दि.१५(प्रतिनिधी)- विनापरवानगी रात्री उशिरापर्यंत हळदीच्या कार्यक्रमात बॅण्ड वाजवितांना मिळून आलेल्या दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

नंदुरबार तालुक्यातील पिंप्रीपाडा येथील शिड्या धर्मा गावित याने मुलाच्या हळदीच्या कार्यक्रमात कोणतीही पूर्वपरवानगी न घेता रात्री उशिरापर्यंत मोठ्या आवाजाने बॅण्ड वाजविले. यामुळे न्यायालयीन आदेशाचे उल्लंघन झाले. याबाबत पोकॉ. सचिन पांडूरंग सैंदाणे यांनी नंदुरबार तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार शिड्या धर्मा गावित (रा. पिंपरीपाडा), महेश साराज्या गावित (रा. बंधारपाडा, ता. नवापूर) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हेकॉ. विनायक सोनवणे करीत आहेत.

# महापालिका हद्दीतील जागा स्वच्छ करा- कापडणीस

धुळे,दि.१५-महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत घरातील स्वच्छता विषयी शहरातील खुल्या जागेत मोठ्या प्रमाणात अस्वच्छता व झाडे, गवत उगवले असल्याचे निदर्शनास आले होते. त्याचप्रमाणे येत्या काही दिवसात पावसाला सुरुवात होणार आहे. त्यानुसार शहरातील खुल्या जागेतील मालमत्ताधारकांना आपल्या जागेची स्वच्छता न केल्यास सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण होऊन रोगराई होण्याची शक्यता आहे. त्यानुसार आयुक्त नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम संपूर्ण शहरात राबविण्यात येत आहे अशा ओपन प्लॉट धारकांना नोटीस बजावण्यात येत असून नोटीस मिळाल्यापासून मिळाल्यापासून ७ दिवसाच्या आत संपूर्ण जागेची स्वच्छता करून घेण्याबाबत कळवण्यात आलेले आहे. याबाबत संबंधित प्लॉट धारकाने स्वच्छता न केल्यास भारतीय न्याय सहिंता कलम २७१,२७२,२८०,२९२ व २९३ अन्वे गुन्हा दाखल करण्यात येईल व दंडात्मक कारवाई करण्यात येईल याबाबत नोटीस बजावण्यात येत आहे.

# उपोषणकर्ते माणिक निलेवाड यांच्या मृत्यूस कारणीभूत अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा : मागणीचे निवेदन

**शहादा,दि.१५(का.प्र.)- नांदेड येथील नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातील सेवक व उपोषणकर्ते स्व. माणिक उद्धव निलेवाड यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या दोषी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थेच्या वतीने नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवण्यात आले आहे.**




निवेदनात नमूद केल्यानुसार, स्व. माणिक निलेवाड हे२००६ पासून सदर महाविद्यालयात कार्यरत होते. २०२२ पासून ते कायम सेवा पदावर होते. सुरुवातीला त्यांना नियमित वेतन मिळाले, मात्र काही महिन्यांपासून प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांचे वेतन अचानक बंद केले. या अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी ते उपोषणास बसले होते. उपोषण दरम्यान प्रकृती खालावल्याने इस्पितळात उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.भोई समाज संघ संस्थेच्या वतीने असा आरोप करण्यात आला आहे की, संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना अत्यंत अर्वाच्य भाषेत अपमानित करून आत्महत्येस प्रवृत्त केले. प्रशासकीय यंत्रणा आणि संस्थेच्या संचालक मंडळाने केलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळेच एका कर्त्या पुरुषाचा जीव गेला असून त्यांचे कुटुंब उघड्यावर आले आहे.निवेदनातील प्रमुख मागण्या अशा,स्व. माणिक निलेवाड यांच्या पतकीला अनुकंपा तत्त्वावर तातडीने नोकरीत सामावून घ्यावे.या संपूर्ण प्रकरणाची सीआयडी मार्फत सखोल चौकशी व्हावी.मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. त्यांचे थकीत वेतन वारसांना एकरकमी देण्यात यावे.या मागण्या मान्य न झाल्यास अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थेच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.याप्रसंगी अखिल भारतीय भोई समाज सेवा संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुपडू खेडकर, इंजि. रामकृष्ण मोरे, जयंतीलाल खेडकर, ॲड. प्रकाश भोई, अशोक शिवदे, विवेक खेडकर, तुकाराम लांबोळे, आर.डी. मोरे, महेंद्र साठे, डॉ. गणेश ढोले, सुरेश वाडीले यांच्यासह समाजातील अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# एन.एच.एम.यु अंतर्गत दवाखाना महापौर परदेशींच्या हस्ते भुमीपूजन

**धुळे, दि.१५- शहरातील उत्तरेकडील भागात वास्तव्यास असलेल्या नागरिकांना मागील ३० ते ४० वर्षांपासून प्राथमिक आरोग्य सुविधा सोयीच्या अंतरावर उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. आरोग्य सेवांसाठी दूर अंतरावर जावे लागत असल्याने सर्वसामान्य, गरीब व ज्येष्ठ नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. या गंभीर प्रश्नाची दखल घेत नगरसेवक ललित माळी यांनी पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावला आहे.**

धुळे शहराचे आ.अनुप अग्रवाल यांनी नागरिकांच्या आरोग्याशी निगडित या अत्यंत महत्त्वाच्या मागणीस प्राधान्य देत नव्या नागरी आरोग्य दवाखान्याच्या उभारणीस भक्कम पाठबळ दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनिक स्तरावरील आवश्यक प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यात आल्या व प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्यासाठीचे मार्ग मोकळे करण्यात आले. त्यामुळे परिसरातील नागरिकांकडून आमदार अनुप अग्रवाल यांच्या संवेदनशील व विकासाभिमुख नेतृत्वाचे कौतुक करण्यात येत आहे.



प्रभाग क्रमांक १ मधील फॉरेस्ट कॉलनी येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या नागरी आरोग्य दवाखान्याचे भुमीपूजन धुळे शहराच्या महापौर सौ. मायादेवी परदेशी यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

यासाठी नगरसेवक ललित गंगाधर माळी यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करत हा दवाखाना मंजूर करून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. प्रशासन स्तरावर वारंवार पाठपुरावा करून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असलेली ही सुविधा प्रत्यक्षात आणण्यात त्यांना यश मिळाले. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या उपक्रमासाठी नगरसेवक सुभाषजी जगताप, सौ. योगिता कुठे व सौ. उज्वला भोसले यांनी देखील मोलाचे सहकार्य केले. तसेच भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व सरचिटणीस सुनीलजी कपिल, अमोल भाऊ मराठे व संदीप भाऊ गुरव यांनीही सदर दवाखान्यासाठी विविध स्तरावर प्रयतक करून या उपक्रमाला सहकार्य केले.

भुमीपूजन प्रसंगी कॉलनीचे सचिव रवींद्र इंगळे, शिवाजी माळी, अरुण कळाल, दिलीप सुरशे, चौधरी साहेब, मयुर धात्रक, रुपेश सूर्यवंशी यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरुन

### शिधापत्रिकाधारकांसाठी दुरुस्तीची संधी

लाभ मिळण्यापासूनही वंचित राहावे लागत आहे. याबाबत अनेक नागरिकांच्या तक्रारी वाढत आहेत.

या पार्श्वभूमीवर धुळे जिल्हा पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली असून, धुळे ग्रामीणच्या तहसील कार्यालयामार्फत ही नावे पुन्हा धुळे जिल्हा पुरवठा विभागाकडे नोंदणी करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. यासाठी ज्या व्यक्तींची नावे शिधापत्रिकेत आहेत, परंतु ती ऑनलाइन नाशिक विभागात दाखविली जात आहेत, अशा व्यक्तींनी मे ते मे या कालावधीत सकाळी ते सायंकाळी पाच या वेळेत धुळे ग्रामीणच्या तहसील कार्यालयातील टपाल शाखेत आपल्या आधार कार्डच्या झेरॉक्स प्रतीसह आपले अर्ज जमा करावेत. हे अर्ज जमा केल्यानंतर धुळे शहर व जिल्हा पुरवठा विभागातर्फे योग्य ती पडताळणी करून संबंधित कुटुंबांतील त्या- त्या सदस्यांची नावे नोंदवून अडचणी दूर करण्याबाबत तत्काळ कार्यवाही करण्यात येणार आहे.

यापूर्वीही गेल्या वर्षी सुमारे हून अधिक व्यक्तींची चुकून नाशिक पुरवठा विभागात नोंदविली गेलेली नावे पुन्हा धुळे पुरवठा विभागात समाविष्ट करण्यात आली होती. आता पुन्हा तशी संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून, सर्व प्रक्रिया मोफत केली जाणार आहे. या संधीचा संबंधित व्यक्तींनी लाभ घेत धुळे ग्रामीण तहसील कार्यालयात आपल्या आधार कार्डच्या झेरॉक्स प्रतीसह अर्ज जमा करावेत. यासंबंधी काही अडचणी आल्यास एबी फाउंडेशनचे समन्वयक दत्तात्रय पारखे (मोबाईल- ) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी केले आहे.

### कृष्णा भगतवर सक्त करवाईची मागणी

त्रास देत होता. पिडीत मुलीच्या वर्तनातील बदल तिच्या आजीच्या लक्षात आला. आजीने सामाजिक कार्यकर्त्यांना माहिती देऊन या घटनेला वाचा फोडली आहे. या घटनेमुळे शहरातील मालेगाव रोडवरील प्रेरणा बहुउद्देशीय संघटनेच्या तृतीयपंथी पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. काही नागरिकांना सोबत घेऊन तृतीयपंथीयांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने करीत संतप्त भावना व्यक्त केल्या. प्रशासनाने याबाबत गांभीर्याने कारवाई करावी. बनावट तृतीयपंथी होऊन नागरिकांना गंडवणाऱ्यांचा शोध घ्यावा. नागरिकांनी श्रध्दा ठेवावी पण, अंधश्रध्दाळू होऊ नये. पोलिसांनी सुभाष चित्ते उर्फ कृष्णा भगत याच्यावर सक्त कारवाई करावी. संशयित आरोपी केवळ महिलेचा वेश परिधान करून लोकांची दिशाभूल करत होता, त्याचा तृतीयपंथी समाजाशी कोणताही संबंध नाही. श्रद्धेच्या नावाखाली महिलांची आणि मुलींची फसवणूक करणाऱ्या भोंदू कृष्णा भगत आणि त्याच्यासारख्या इतरांवर पोलिसांनी लक्ष ठेवावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### विभा.पो.महासंचालकपदी पडवळ यांची नियुक्ती

त्यांची भरती वर बदली झाली आहे बढतीवर बदली झाली आहे. याच प्रमाणे धुळे जिल्ह्याचे माजी पोलीस अधीक्षक संजय बारकुल यांची पोलीस अधीक्षक महाराष्ट्र पोलीस अकादमी येथून बदली होऊन समादेशक राज्य राखीव पोलीस बलगट क्रमांक तीन जालना येथे बदली झाली आहे.

### २२ मे पासून धावणार उधना-निजामुद्दीन रेल्वे

निजामुद्दीनसाठी तर दि.२४ मे रोजी निजामुद्दीन जक्शन येथून उधनासाठी अशा दोन फेऱ्या असणार आहे. या दोन्ही फेऱ्यादरम्यान उधना-निजामुद्दीन एक्सप्रेस रेल्वेगाडीला नवापूर, चिंचपाडा, नंदुरबार, भुसावळ या रेल्वेस्थानकांवर थांबा असणार आहे. त्यानंतर पुढे इटारसी, भोपाल, विरांगणा लक्ष्मीबाई जक्शन, आग्रापेठ व निजामुद्दीन अशा रेल्वेगाडीचा प्रवास असेल. ही रेल्वेगाडी पुर्णपणे अनारक्षीत असणार आहे. त्यात १८ स्लिपर कोच, एसएलआरडीचे २कोच, जनरलचे २ कोच असे २२ डबे असतील. यामुळे प्रवाशांची निजामुद्दीनला जाण्यासाठी सोय होणार आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : जिल्हा धुळे तालुका धुळे मौजे बाभुळवाडी हद्दीतील गट नं. ९६/१/ब चे एकूण क्षेत्र १ हे. ०० आर. आकार १ रु. २८ पैसे शेतजमीन यांसी मापे व चतु:सिमा गाव नकाशा प्रमाणे ही शेत मिळकत कायमस्वरुपी खरेदीचा सौदा आमचे अशिल फिरोज खान अशरफ खान रा. धुळे यांनी शेत मिळकतीचे कायदेशीर मालक मोहम्मद अफजल निजामुद्दीन शेख यांचेशी केला आहे. बयाणा रक्कम दिली गेली आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, कोर्टवाद, सॉल्वन्सी, आरक्षण, हितसंबंध, देणे घेणे वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे. असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे सजमून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे. असे समजून संबंधीतास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकारांनी दिलेल्या माहिती अधिकार व दाखविलेल्या कागदपत्रांच्या आधारे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे..

धुळे दि. १५/०५/२०२६

**ॲड.जमील खान एस.पठाण**
पत्ता : चेंबर नंबर १०७, जिल्हा न्यायालय आवार, स्टेशनरोड, धुळे
मो.९८२३०६८५०७/८६६९११७६५८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व बॅका, सर्व वित्तीय पतसंस्था, यासी जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकत वर्णन-** तु.जि.धुळे पो. तु.ता.धुळे, मौजे **बोरीस** येथील **शेतजमिन गट. नं.२७७ चे क्षेत्र ०१ हे. ८० आर.** यासी चतु:सिमा गाव नकाशाप्रमाणे

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत **श्री गिरधर तानकु माळी** रा.देवपूर, धुळे यांचे मालकी व ताबे उपभोगातील आहे आमचे अशिल यांच्याशी सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहेत.

मिळकत निर्बोज व निर्वेध असल्याचे सांगितले आहे. उपरोक्त शेती बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, जप्ती, टांच, वारस, बक्षिस, बोजा, सौदा, इ. बाबत हरकत असल्यास प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर प्रत्यक्ष हरकतीसोबत योग्य तो कागदोपत्री पुरावा सादर करून शहानिशा करून दयावी. टपाल व फोनवर परस्पर हरकत मान्य होणार नाही मुदतीत हरकत न आल्यास मिळकत निर्बोज आहे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल मुदती नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. ते आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे प्रस्तुतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहिती व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दिस दिली असे.

धुळे, दिनांक:– १५/०५/२०२६.

**ॲड.लव विजय शर्मा**
घर नं.१९५८, किसनबत्ती चौक, ग.नं.५ व ६ बोळ, माहेर साडी जवळ, धुळे
मो.नं.९४२२७७०२७०

## DECLARATION

I Hereby Declare that my mother old Name on My Marksheet Was **Najama B** Was Been Changed To New Name **Najama Bi** so on words All Official Must Be Done By My New Name Only **Najama Bi**

## जाहीर नोटीस

नि. ७

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.ज्युनी. डिव्ही.यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं. ३८०/२०२६**
**नि.नं. ७ चौ. ता. १७/६/२०२६**

**१)मालिनी नारायणराव गरुड, २) नितीन नारायणराव गरुड**
**३) निलेश नारायणराव गरुड,** नं. १ ते ३ रा. ३०, गायत्री कॉलनी, निमझरी रोड, शिरपूर जि. धुळे
**४) निलिमा निलेश चव्हाण,** रा. डी. ४, दिक्षाभुमीजवळ, लक्ष्मीनगर, राणाप्रतापनगर, नागपूर ... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार
नारायण उर्फ नारायणराव गुलाबराव गरुड,
मयताचा पत्ता : ३०, गायत्री कॉलनी, निमझरी रोड,
शिरपूर जि. धुळे मृत्यू दि. ०८/०९/२००३ ...मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील नामे नारायण उर्फ नारायणराव गुलाबराव गरुड हे दि. ०८/०९/२००३ रोजी मौजे शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं. १ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. १६/०६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही असे गृहीत धरण्यात येवून, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

नि. ७

**मे. दिवाणी न्यायाधीश सो. शिरपूर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज नं. /२०२६**

**प्रकाश दोधू भिल (पवार)** ... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार नं. १ व २ यांचा मुलगा तसेच अर्जदार नं. ३ चा भाउ नामे निंबा प्रकाश पवार (भिल) हे दि. ०५/०८/२०२५ रोजी मौजे आंबे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाल्याने अर्जदार नं. १ व ३ यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. १६/०६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही असे गृहीत धरण्यात येवून, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

कनिष्ठ लिपीक — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वलवाडी ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ३३/२/३ पैकी प्लॉट नं. १८ क्षेत्र १६०.०० चौ. मी. ही मिळकत आमचे अशिल श्री. वसंतराव नारायण पाटील रा. प्लॉट नं. १८, इंद्रप्रस्थ कॉलनी, स्टेडीयम जवळ, वलवाडी, गोंदूर रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी दि. १७/०२/१९९७ रोजी सदर मिळकत नोंदणीकृत दस्त नं. ५१०/१९९७ अन्वये खरेदी केलेली आहे. मात्र सदर रजि. खरेदीखताचा मुळ दस्त ठेवलेली फाईल दि. ०८/०४/२०२६ रोजी स्टेडीयम कडून धुळे शहरात गावात जात असतांना स्टेडीयम परिसरात सकाळी ११.०० वाजेचे सुमारास सदर फाईल रस्त्यात पडून सदरचा मुळ दस्ताची फाईल गहाळ झालेली/हरविलेली आहे.

तरी वर नमूद रजि. खरेदीखताचा मुळ दस्त कोणासही आढळून आल्यास खालील पत्त्यावर आणून देण्यात यावा, ही विनंती. कळावे करीता जाहीर नोटीस दिली असे.

सदरची नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारान्वये आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

जाहीर नोटीस देणार : **श्री. वसंतराव नारायण पाटील**

रा. प्लॉट नं. १८, इंद्रप्रस्थ कॉलनी, स्टेडीयमजवळ, वलवाडी गोंदूर रोड, धुळे मो. नं. १८८११९८३७७

सदरची नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारान्वये आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

**ॲड.सुभाष जी. विसपुते**
६-अ, यशोदाई विशाल इस्टेट, राष्ट्रवादी भवन जवळ, स्टेशनरोड, धुळे
मो.नं.९७३०८०३५००

## श्री गुजराती समाज धुलिया

### वार्षिक सर्वसाधारण सभा

जा.क्र.५/२०२६ दि.२८/०४/२०२६

**मान्यवर स्वजन भाईयो तथा बहेनो**

**सस्नेह नमस्कार!**

आपणांस कळविण्यात येते की, श्री गुजराती समाज, धुळे ची **वार्षिक सर्वसाधारण सभा** दिनांक १७ मे २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता **''हॉटेल गणपती प्यालेस, मालेगाव रोड, धुळे''** येथे समाजाचे अध्यक्ष ॲड श्री.संजीव आर. वाणी यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सदर सभेस आपण सर्व समाज बांधवांनी अवश्य उपस्थित राहून सभेत आपला सहभाग नोंदवावा हि नम्र विनंती.

**✻ वार्षिक सर्व साधारण सभे पुढील विषय ✻**

१) मागील सर्वसाधारण सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे.
२) मागील जमाखर्चास मंजुरी देणे बाबत.
३) योजना मसुदा (घटना) मंजूर करणे बाबत.
४) ग्रीन पार्क धुळे येथील समाजाची मिळकत फायनल प्लॉट नं.२१०/ब पैकी प्लॉट नं.२ क्षेत्र ३१०८ चौ.फुट व प्लॉट नं.३ क्षेत्र ३२६८ चौ.फुट च्या मिळकतीची विक्री करून धुळे शहरात किंवा धुळे शहरालगत समाजासाठी योग्य अशी जागा घेऊन त्यावर समाज भवन बांधणे.
५) म.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**✻ विशेष सूचना ✻**

✻ कोरम अभावी सभा न घेता आल्यास अशी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर भरविण्यात येईल, अशा सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.
✻ वार्षिक सर्वसाधारण सभेत समाजाच्या हितासाठी योग्य अशी काही योजना कोणा सदस्यास सूचित करून त्यावर चर्चा घडवून निर्णय व्हावा असे अपेक्षित असेल तर अशा सूचना सभेच्या चार दिवस आधी समाजाच्या सचिवांकडे लेखी पाठविणेस विनंती आहे.
✻ समाजाच्या कामकाज विषयी काही सूचना करावयाच्या असतील तर अशा सूचना सभेच्या चार दिवस आधी मंडळाच्या सचिवांकडे लेखी पाठविणेस विनंती आहे.

| सचिव | सह-सचिव | अध्यक्ष |
|---|---|---|
| (अंकुर अनिल शाह) | (डॉ. विशाल वाणी) | (अँड.संजीव आर. वाणी) |

टिप: मिटिंग नंतर अल्पोपहार ठेवण्यात आला आहे.
आपने सहु साथे तो दुनिया लईसु माथे

## जाहीर नोटीस

नि. ७

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्यु. डि. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ३८८/२०२६

**१) इंदूबेन संभाजीभाई पाटील, २) विजयभाई संभाजीभाई पाटील**
दोघे रा. भगवती परा, शिवाजी चौक, २५, वारीया प्लॉट,राजकोट पो. राजकोट बेडीपरा, ता. जि. राजकोट (गुजरात) ..... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

त्याअर्थी मयत कै. संभाजी झेंडू पाटील हे दि. २९/०५/२०२४ रोजी मौजे बलकुवे, ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत / आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १६/६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही. असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल. दि. २७/०४/२०२६

**कनिष्ठ लिपीक**, दिवाणी न्यायालय, शिरपूर — (कोर्टाचा शिक्का) — **सहाय्यक अधिक्षक**, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

नि. ७

**मे. दिवाणी न्यायाधीश सो. शिरपूर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज नं. ३६४/२०२६**

**ज्ञानेश्वर गुलाब जमादार** ... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांची आई नामे पमाबाई गुलाबसिंग जमादार ही दि. ०१/०७/२०२४ रोजी मौजे आढे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाल्याने अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. १२/०६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही असे गृहीत धरण्यात येवून, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

कनिष्ठ लिपीक — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक

## जाहीर नोटीस

नि. ७

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनी. डिव्ही यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ३८६/२०२६

**१) राजेंद्र पंडीत भिल, २) संदिप पंडीत भिल,**
**३) उषा पंडीत भिल, ४) शोभा पंडीत भिल**
सर्व रा. विखरण बु.॥ ता. शिरपूर जि. धुळे ..... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

त्याअर्थी अर्जदार राजेंद्र पंडीत भिल वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे जयवंताबाई पंडीत भिल ह्या दि. २२/०२/२०२३ रोजी मौजे सिधेश्वर हॉस्पिटल, धुळे ता. जि. धुळे येथे उपचारादरम्यान मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे जयवंताबाई पंडीत भिल यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. १६/६/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

**कनिष्ठ लिपीक**, दिवाणी न्यायालय, शिरपूर — (कोर्टाचा शिक्का) — **सहाय्यक अधिक्षक**, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

नि. ७

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ३९८/२०२६**

**चंद्रकांत दिगंबर बागुल**
रा. दामशेरपाडा, थाळनेर ता. शिरपूर जि. धुळे ... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

कै. दिगंबर लक्ष्मण बागुल, (मृत्यू दि. २५/०८/२०२०)
रा. दामशेरपाडा, थाळनेर, ता. शिरपूर जि. धुळे ... मयत

ज्याअर्थी मयत दिगंबर लक्ष्मण बागुल हे दि. २५/०८/२०२० रोजी मौजे थाळनेर, ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेश अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी तसेच औपचारीक कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १८/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि. २८/४/२०२६

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

पान १ वरुन

## आयोग स्वायत्त असल्याचा देखावा कशासाठी

राजकीय नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून आव्हान दिले होते. निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठीच्या समितीमधून सरन्यायाधीशांना वगळण्यात आल्याने हा निर्णय मागे घेण्याची मागणी याचिकेत करण्यात आली. हा कायदा सर्वोच्च न्यायालयाच्या दोन मार्च २०२३ च्या निकालाचे उल्लंघन करतो. ज्यामध्ये संसदेकडून कायदा होईपर्यंत पंतप्रधान, सरन्यायाधीश आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते यांचा समावेश असलेल्या समितीच्या सल्ल्यानुसार निवडणूक आयोगाच्या सदस्यांची नियुक्ती करण्याचे आदेश दिले होते. या प्रक्रियेतून सरन्यायाधीशांना बगळल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची धार बोथट झाली आहे. कारण, या नियुक्त्यांमध्ये पंतप्रधान आणि त्यांचे नामनिर्देशित उमेदवार हेच नेहमी निर्णायक घटक असतील, असे या याचिकांमध्ये म्हटले आहे.

**न्यायालय म्हणाले..**

सीबीआय संचालकांच्या नियुक्ती समितीत सरन्यायाधीश होते. परंतु निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती समितीत कोणत्याही स्वतंत्र सदस्याचा समावेश करण्यात आलेला नाही. निवडणूक आयोगाची नियुक्ती प्रक्रिया अधिक महत्त्वाची आहे. कारण, तिचा थेट संबंध लोकशाही आणि निष्पक्ष निवडणुका टिकवून ठेवण्याशी आहे. केंद्रीय निवडणूक आयोग केवळ तटस्थ नसावा, तर तो आपल्या कामकाजात तटस्थ दिसला पाहिजे, अशी निरिक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदविली आहेत.

## नीट परीक्षा आता २१ जूनला होणार

सीसीटीव्ही देखरेख आणि तपासणी व्यवस्था ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. दरम्यान, सोशल मीडियावर परीक्षा संदर्भात अनेक अफवा आणि भ्रामक संदेश व्हायरल होत असल्याने विद्यार्थी आणि पालकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. अधिकृत वेबसाईट आणि अधिकृत सूचनांवरच विश्वास ठेवावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तज्ज्ञांच्या मते, आता नवीन अभ्यास सुरू करण्याऐवजी रिव्हिजन, मागील प्रश्नपत्रिका आणि मॉक टेस्ट सोडवण्यावर भर द्यावा. वेळेचे योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण सराव विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे. परीक्षा केंद्रांची माहिती, प्रवेशपत्र आणि इतर आवश्यक सूचना विद्यार्थ्यांच्या नोंदणीकृत मोबाईल नंबर आणि ईमेलवर लवकरच पाठवण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण आल्यास हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधता येणार आहे.

## सातारा येथे राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण

मदत व पुनर्वसन मंत्री नामदार मकरंद जाधव, ग्रामविकास विभागाचे राज्यमंत्री नामदार योगेश कदम खासदार श्री उदयनराजे भोसले जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती याशनी नागराजन यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

या अभियानांतर्गत विभाग, जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत अशा विविध स्तरांवर पुरस्कार देण्यात आले. त्यात सर्वोत्कृष्ट विभाग: कोकण विभाग प्रथम, नाशिक विभाग द्वितीय, नागपूर विभाग तृतीय.सर्वोत्कृष्ट जिल्ह्यांमध्ये गोंदिया प्रथम, पालघर द्वितीय, अकोला तृतीय. सर्वोत्कृष्ट तालुक्यांमध्ये पातूर अकोला, अहिल्यानगर आणि मौदा नागपूर यांनी प्रधानमंत्री आवास योजनेत बाजी मारली आहे.

राज्य पुरस्कृत आवास योजनामध्ये धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्याला सर्वोत्कृष्ट तालुका म्हणुन राज्यात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार केंद्रीय ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री नामदार शिवराजसिंह चौहान आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शिरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रदीप पवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार रावल, आमदार अमरिशभाई पटेल, आ. काशीराम पावरा, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख यांच्या नेतृत्वाखाली आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश इंगळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजन पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत स्नेहा पवार, शिरपूरचे गट विकास अधिकारी प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या अंमलबजावणीमुळे हे यश मिळाले आहे.

या सोहळ्यासाठी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पुरस्कारासाठी पात्र ठरलेले अधिकारी व लोकप्रतिनिधींना निमंत्रित करण्यात होते. सातारा येथे आज पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्याचे विविध समाज माध्यमातून थेट प्रक्षेपण करण्यात आले. धुळे जिल्ह्यातील चारही पंचायत समिती कार्यालयात त्यासाठी व्यवस्था करण्यात आली होती. तसेच ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात देखील तशी व्यवस्था केली होती. शिरपूर पंचायत समितीला मिळालेल्या पुरस्काराच्या अभिमानास्पद क्षणाचे अनेक जण प्रत्यक्ष साक्षीदार ठरले.

## सुशीनाला काठावरील अतिक्रमितांच्या

मध्यवर्ती सभागृहात नागरिकांनी आपली कागदपत्रे जमा करण्यासाठी गर्दी केल्याचे पहावयास मिळाले. यातील विस्थापित कुटुंबीयांना प्रधानमंत्री आवास योजना तसेच शबरी आवास योजनेअंतर्गत लाभ मिळवून देता येईल का, या दृष्टीकोनातून हे शिबीर घेण्यात आले होते, अशी माहिती महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आली.

## खंडणी व शरीर संबंध महिलेकडे मागणी

परिचयानंतर भेटण्यासाठी त्याच्या घरी बोलावले. भेटायला आली नाही तर तुझे वैयक्तिक छायाचित्रे व व्हिडीओ व्हायरल करून बदनामी करेल, अशी दमदाटी केली. यामुळे बदनामीच्या भितीने पीडिता उमेर अन्सारी याच्या घरी गेली. तेथे त्याने तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत शरीर संबंधाची मागणी केली. महिलेने नकार दिल्यानंतर तिच्याकडून पाच लाख रुपयांची खंडणी ही मागितली, असेही पीडितेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार संशयित उमेर अन्सारी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. हवालदार मनोज पाटील तपास करीत आहेत.

## बनावट दारू कारखाना प्रकरणी

बसते याची चौकशी करण्याची गरज आहे. आरोपी खरोखर तुरी देऊन पळाला की विशिष्ट कामासाठी पाठवला तो परतच आला नाही याबाबतही वरिष्ठांनी तपास करणे आवश्यक आहे. अन्यथा हा प्रायोजित लपाछपीचा खेळ सुरुच राहील व बनावट मद्याचा विळ-खाही कायम राहील अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.

## बनावट नोटा बँक मशिनमध्ये भरल्या

अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. अधिकाऱ्यांनी तातडीने सीसीटीव्ही फुटेजची मदत घेत चौकशी केली. त्यावेळी हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी बँकेचे सहायक प्रबंधक मयूर पाटील यांनी आझाद नगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार संशयित सचिन पिसोटे याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला. आझाद नगर पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक निवृत्ती पवार, उपनिरीक्षक महेश घायतड यांनी घटनास्थळाची पाहणी केली असून तपास सुरू आहे.

## जनगणनेच्या कामातील शिक्षकांवरील

घेण्यात यावे. अशी मागणी धुळे महानगर माध्यमिक शिक्षक संघ धुळेचे संजय पवार, व्हि.टी.गवळे, दिलीप पाटील, कानिफनाथ सुर्यवंशी, संजय पाटील, एम.बी.मोरे, रणजित शिंदे, एस.जी.पाटील, पी.एन.सुर्यवंशी, मनोहर चौधरी, डी.एस.मासुळे, एस.बी.महाजन, पी.एस.ठाकूर यांनी केली.

## प्रियांक कानूनगो यांचा नंदुरबार जिल्हा दौरा

सर्वसमावेशक विकासविकासाशी संबंधित प्रमुख विषयांच्या अंमलबजावणीची स्थिती तसेच प्रत्यक्ष सद्यस्थितीचा सखोल आढावा घेण्यात येणार आहे. यानंतर ते डेडीयापाडा, नर्मदा (गुजरात) कडे प्रस्थान करणार आहेत. या दौऱ्यादरम्यान संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून आवश्यक माहिती सादर करण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत, असे निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी यांनी कळविले आहे.

पान १ वरुन

## दुहेरी हत्याकांडामुळे शिरपूर शहर हादरले

दरभंगा येथे गंगा महतो यांच्या मुलीचा विवाह होता. विवाहानंतर चंदन व त्याची पतकी निधी तीन दिवसांपूर्वी शिरपूरला परतले. गंगा महतो व त्यांची पतकी १५ मेस सकाळी साडेअकराला घरी आले. प्रवासाचा शीण आल्याने जेवण करून दोघेही बाहेरील हॉलमध्ये झोपले होते. दुपारी दोनला चंदन महतो याने दगडी खलबत्त्याने दोघांच्या डोक्यात वार केले. त्यांच्या मरणापूर्वीच्या आरोळ्या ऐकल्यानंतर सून निधी खोलीबाहेर आली. तेथील भीषण दृश्य पाहून तिने खोलीत जाऊन कडी लावून घेतली. तिने आरडाओरड केल्यानंतर घरमालक व शेजारी धावून गेले. समोरील दृश्य पाहून ते जागीच थिजले. महतो पतीपतकीचे रक्त जिन्यावरुन खाली वाहत होते. पोलिसांना माहिती मिळताच डीवायएसपी विश्वजीत जाधव, निरीक्षक किशोरकुमार परदेशी, उपनिरीक्षक हेमंत खैरनार, संदीप दरवडे व गुन्हे शोध पथकाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन संशयित चंदन महतो याला ताब्यात घेतले.

अवमान केल्याने खून : मृत गंगा महतो करवंद येथील सॅनस्टार कंपनीत लेबर कॉंट्रॅक्टर होते. मुलगा चंदन काहीच काम करीत नसल्यामुळे ते नाराज होते. त्यांची नाराजी उघडपणे बोलून दाखवत ते त्याचा पाणउतारा करीत होते. तीन वर्षापूर्वी चंदनचा विवाह झाला. मात्र त्याच्या पतकीसमोरही गंगा महतो त्याचा वारंवार अवमान करीत होते. दरभंगा येथे बहिणीच्या विवाहादरम्यानही त्याचा वडिलांनी अपमान केला. त्यामुळे बिथरून जाऊन आपण दोघांचा खून केला अशी माहिती चंदन महतो याने दिल्याचे पोलिसांनी सांगितले. घरमालक शिकुमार मोहनलाल सैनी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन त्याच्याविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## सोनगीर ग्रामीण रुग्णालयाचा रामभरोसे कारभार

गायब असल्याचे चित्र गंभीर आहे.अवघ्या दहा दिवसांपूर्वी सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर धनगर हे अपघातात गंभीर जखमी झाले होते, तेव्हाही त्यांना वेळेवर उपचार आणि रुग्णवाहिका मिळाली नव्हती. दुर्दैवाने त्यांचा मृत्यू झाला.त्या घटनेनंतर धुळे जिल्हा शल्य चिकित्सकांनी स्वतः भेट देऊन चौकशी केली होती. मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटीनंतरही सोनगीर ग्रामीण रुग्णालयाचा कारभार सुधारण्याऐवजी मजैसे थेफ्ञ राहिल्याने आरोग्य विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करून दोषी डॉक्टरांवर आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## एस.व्ही.के.एम. सीबीएसई विज्ञान विभागाची

फयेझा अब्रार पठाण ८५.४० टक्के गुण मिळवून या दोघींनी संयुक्तरित्या पाचवा क्रमांक पटकावला. सायन्स विभागातील सर्व २८ विद्यार्थी भरघोस गुणांनी उत्तीर्ण झाले. यात दोन विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण पटकावले. १३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले व उर्वरित विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

कॉमर्स विभागातून निवेधा अलोक अग्रवाल ९१.२० टक्के गुण मिळवून प्रथफ क्रमांक पटकावला. प्रतिक पाटील ९०.६० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, आयुष सिंग ८५ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक, राशी आशिष कुलकर्णी ८४.६० टक्के गुण मिळवून चतुर्थ क्रमांक, ईशान जोगानी ८४.२० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक प्राप्त केला. कॉमर्स शाखेतील सर्व १४ विद्यार्थी भरघोस गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. यात दोन विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण पटकावले. १० विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले व उर्वरित विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे एस.व्ही.के.एम. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, संस्थेचे सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, एस.व्ही.के.एम. एन.एम.आय.एम.एस. प्रेसिडेंट व चान्सलर स्नेहा अंकित पारीख, व्यस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, प्राचार्या सुनंदा मेनन, उपप्राचार्या पिंकी साहा, सर्व शिक्षक, पालक यांनी अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## शिक्षक पात्रता परिक्षा प्रमाणपत्राचे वितरण

धुळे, दि.१५- महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ चे आयोजन २३ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले होते. परीक्षेत पेपर क्र.१ पहिली ते पाचवी, क्र.२ इ.सहावी ते इ.आठवी स्तर चा अंतिम निकाल दि.३ फेब्रुवारी २०२६ रोजी ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात आला होता. परीक्षेतील पात्र उमेदवारांची पात्रता प्रमाणपत्राचे वाटप दि.१८ मे ते ८ जून २०२६ या कालावधीत केले जाणार आहे.

# नवापूरातील अतिक्रमणे होणार नियमित नगराध्यक्ष जयवंत जाधव यांची माहिती

**नवापूर, दि.१५ प्रतिनिधी- राज्यातील महायुती सरकारने सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा महत्त्वपूर्ण निर्णय घेत २०११ पूर्वी शासकीय जागांवर निवासी अतिक्रमण करून वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना मोठा दिलासा दिला आहे. शासनाच्या नव्या निर्णयानुसार २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे ठराविक अटी व शर्तींच्या अधीन राहून नियमित करण्यात येणार आहेत. त्यामुळे अनेक वर्षांपासून असुरक्षिततेच्या छायेत राहणाऱ्या कुटुंबांना आता हक्काचे घर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**



या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी नवापूर नगरपरिषद प्रशासन सज्ज झाले असून नगराध्यक्ष जयवंत पांडुरंग जाधव यांनी स्वतः शहरातील विविध भागांना भेट देत नागरिकांशी संवाद साधला. त्यांनी संबंधित वस्त्यांमध्ये जाऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच शासनाच्या निर्णयाबाबत माहिती दिली.

नगराध्यक्ष जयवंत जाधव म्हणाले की, सर्वसामान्यांच्या डोक्यावर हक्काचे छप्पर असावे, हे महायुती सरकारचे ध्येय आहे. अनेक वर्षांपासून शासकीय जागांवर वास्तव्य करणाऱ्या गरीब व गरजू कुटुंबांना आता दिलासा मिळणार आहे. पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह नगरपालिकेशी संपर्क साधावा.

शहरातील अनेक गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबे वर्षानुवर्षे शासकीय जागांवर राहत आहेत. मात्र मालकी हक्क नसल्याने त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यात तसेच मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे तयार करण्यात अडचणी येत होत्या. ही बाब लक्षात घेऊन राज्य सरकारने २०११ पूर्वीच्या निवासी अतिक्रमणांना नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे.

या प्रक्रियेसाठी नवापूर नगरपरिषदेत स्वतंत्र मदत कक्ष उभारण्यात येणार असून नागरिकांना अर्ज प्रक्रिया, कागदपत्र पूर्तता आणि मार्गदर्शनासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. नियमितीकरणाची प्रक्रिया पारदर्शक आणि सुलभ ठेवण्यावर भर दिला जाणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले.

या निर्णयामुळे नवापूरमधील अनेक कुटुंबांमध्ये समाधानाचे वातावरण असून नागरिकांनी शासन आणि स्थानिक प्रशासनाचे आभार मानले आहेत. आम्ही अनेक वर्षांपासून येथे राहत आहोत, मात्र जागेचा मालकी हक्क नसल्याने सतत भीती वाटायची. आता शासनाच्या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला, अशा भावना काही लाभार्थ्यांनी व्यक्त केल्या.

या निर्णयामुळे नवापूर शहरातील पात्र लाभार्थ्यांना कायदेशीर संरक्षण मिळणार असून अनेक कुटुंबांचे घराचे स्वप्न पूर्ण होण्याची आशा निर्माण झाली आहे. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह नगरपालिकेत संपर्क साधून प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### कैलास खेडकर



नंदुरबार, दि.१५(प्रतिनिधी)- शहरातील नवी भोई गल्ली भागातील रहिवासी कैलास महारु खेडकर यांचे हृदयविकाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५५ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा आज दि.१६ मे रोजी सकाळी दहा वाजता राहते घरापासून काढण्यत येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, दोन मुले व भावंडे असा परिवार आहे. ते शेतकरी सेवा संघातील कर्मचारी जगन खेडकर यांचे बंधू होते.

### भगवान महाले



म्हसावद,दि.१५- शहादा तालुक्यातीलम्हसावद येथील रहिवासी भगवान एकनाथ महाले अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते चावरा इंग्लिश मेडीयम स्कूल शहादा येथील कर्मचारी कैलास महाले यांचे वडील होत.


पाचवाँ स्मृतीदिन



माँ
बादल के बिना
बरसात नही होती
आपकी याद के बिना
दिन की
शुरू आत नही होती.

स्व. सौ. सरस्वतीबाई ईश्वरलाल अग्रवाल
स्वर्गवास
दि. 16/5/21

भावपूर्ण श्रद्धांजली!

-: शोकाकुल :-
ईश्वरलाल मिश्रीलाल अग्रवाल
ओम, दिपक,रुपक (पुत्र), प्रियांशु,
भैरव, चिराग (पौत्र)

फर्म : जय भवानी स्टोन ट्रेडर्स, साक्री रोड, धुलिया

पाहिजेत

ओमश्री अग्रो टेक प्रा. लि.
जी-३२ एम. आय. डी. सी. अवधान धुळे
(सोयाबीन सॉल्व्हंट एक्सट्रॅक्शन)

या कंपनीत खाली दिलेल्या पदांची त्वरीत नेमणूक करण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी खालील मेलवर अर्ज करावा.

१) आवक/जावक लिपीक/ गोडावून सुपरवायझर
२) प्रेप ऑपरेटर
३) असिस्टंट प्रेप ऑपरेटर
४) प्रेप हेल्पर
५) वर्कशॉप फिटर
६) वर्कशॉप हेल्पर
७) इलेक्ट्रीशियन (वायरमन)
८) केमिस्ट
९) बॉयलर अटेन्डंट- ग्रेड १
१०)माळी (बागकाम करणारा)

वरील सर्व पदाकरीता किमांन ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. तरी इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत आपलाअर्ज E-mail- omshree_sep@rediffmail.com वर पाठविणे.

विकणे आहे
मोक्याची जागा R.C.C Built up 600 (Sq.Ft)
४ मजली जिना टोपीसह.
धुळे तालुका पोलिस स्टेशन समोर योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
9423493562

पाहिजेत
शिरपूर येथे
स्वयंपाक कामासाठी १ महिला व घरकामासाठी १ महिला कायमस्वरुपी पाहिजे. जेवणाची व रहाण्याची सोयीसह आकर्षक पगगार मिळेल.
-: संपर्क :-
चेतन पुराणीक
9209201411

अनारसे
खास अधिक मासा साठी
उत्तम प्रतीचे अनारसे मिळतील
नोंदणी आवश्यक आहे.
अनारसा पिठ उपलब्ध आहे.
मदर्स किचन
फूलवाला चौक,धुळे
9049902201
7887750864

पाहिजेत
माल वाटपासाठी ड्रायव्हर व डिलीव्हरी बॉय पाहिजेत
-: समक्ष भेटा :-
कंचन डिस्ट्रीब्युटर्स
तारगल्ली,
सराफ बाजार, धुळे

पाहिजेत
हॉस्पिटल कामासाठी प्रशिक्षित ब्रदर्स आणि सिस्टर पाहिजेत.
दिवस व रात्रपाळीसाठी
अपुर्वा हॉस्पिटल अँड क्रिटीकल केअर
जमनागिरी रोड, धुळे
डॉ.अनिल रघुवंशी
9823085639
9423978968

शेती विकणे आहे
खाते नं. २०१, भुमापन व उपविभाग क्र. ६३३/१ बोअरिंग १, सौर उर्जा बसविले आहे. : १ एकर खामगाव रोड इंग्लीश मेडियमचे पाठी मागे नंदुरबार
: संपर्क :
बिंदीया रमेश साळवे
7066559455
9422288948

पाहिजेत
कॅफे कामासाठी
अनुभवी (शेफ)
कारागिर (१५,००० रू.)
हेल्पर (१०,००० रू.)
पाहिजेत
कॅफे ट्रिट एन जॉय
ग.नं.४ बँक ऑफ महाराष्ट्र समोर, धुळे.

विकणे आहे
रामचंद्र नगरला लागुन दोन रस्त्यांच्या कॉर्नरचा ४००० स्केअर फुटाचा प्लॉट विकणे आहे.
सुरेश चौधरी
9422286235

पाहिजेत
कामासाठी पाहिजे
सेल्समन - २
सेल्सगर्ल - २
श्याम वॉच अॅण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
7219036785
9960777594

प्लॉट विकणे आहे
मौजे बाळापूर, फागणे शिवारातील गट नं. (७६) पैकी ३ आर जमीन विकणे आहे.
सूर्यवंशी टाईल्स समोर
-: संपर्क :-
8530140449
7219240449

चालविण्यास देणे आहे
धडगाव जि.नंदुरबार बस स्थानकात हॉटेल व्यवसायासाठी/ व्यवस्थापक चालविण्यास देणे आहे.
-: संपर्क :-
9404576771

चालविण्यास देणे आहे
धुळे शहरातील मध्यवर्ती बस स्थानकातील मेन्स पार्लर दुकानासाठी कारागिर, व्यवस्थापक चालविण्यास देणे आहे.
-: संपर्क :-
राजु भावसार फेटेवाले
9404576771

पाहिजेत
धुळे एस टी स्टँडवरील पे अँड पार्किंग साठी बिलिंग मशीन ऑपरेटर, व दुचाकी वाहने लावण्यासाठी होतकरू कर्मचारी त्वरीत पाहिजेत. आकर्षक पगार
-: संपर्क :-
9172676376

आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...



atomberg "Why not?"

क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे ३* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरूरत नहीं होती है !
SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE

59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

पाहिजेत
माता हिंगलाज न्युज चॅनलसाठी वृत्त निवेदक-२, प्रतिनिधी-रिपोर्टर-२ धुळे/नंदुरबार व्हिडीओ ईडीटर - २
-: संपादक :-
राजु भावसार फेटेवाले
ग.नं.४, धुळे
9422286386
9404576771

पाहिजेत
होंडा कंपनीचे जनरेटर रिपेअरिंगसाठी कारागीर पाहिजे.
इलेक्ट्रीशियन - २
वेल्डर - २, पेंटर - २
-: संपर्क :-
राजु भावसार फेटेवाले
ग.नं.४, धुळे
9422286386
9404576771

ड्रायव्हर पाहिजेत
गॅस सिलेंडर वितरण करण्यासाठी फोर व्हिलर अनुभवी ड्राईव्हर पाहिजे.
पगार - १०,०००/- १५,०००/-
मंजुश्री गॅस एजंसी
साक्री रोड, धुळे
अमित जावळे
7517568927

पाहिजेत
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

पाहिजेत
FMCG Distributor मध्ये डिलिव्हरीसाठी इंग्रजी वाचता लिहता येणारे डिलिव्हरी बॉय, ड्रायव्हर, सेल्समन पाहिजेत.
पत्ता - अग्रसेन चौकजवळ, धुळे
8767674975

पाहिजे
धुळ्यामध्ये माल वाटपासाठी माणूस/ मुलगा पाहिजे. लिहता, वाचता आणि हिशोब करता येणे आवश्यक.
लाईफ लाईन बेकरी
मालेगाव रोड, धुळे
8999961619


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०